दि. १५ फेब्रुवारी , २०१३

ठाणे महानगरपालिका आयुक्त म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये सन २०१२-१३ चा सुधारित व सन २०१३ - १४ या आर्थिक वर्षाकरिता ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पासाठीचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

माझ्या कारकिर्दीतील ठाणे महानगरपालिकेचा हा तिसरा अर्थसंकल्प आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार सन २०१२-१३ च्या उत्पन्न व खर्चाचा अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार रु.२२७५.१४ कोटीचा अर्थसंकल्प तयार करण्यांत आला होता. सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतरही राजकीय परिस्थितीमुळे स्थायी समितीची स्थापना होण्यास विलंब होत असल्याने अधिनियमातील नव्याने समाविष्ट कलम १०० (अ) "अर्थसंकल्पीय अंदाजांची अंतिम स्वीकृती " नुसार मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सादर करण्यांत आला. न्यायालयीन कारणास्तव मा.महासभेचे आयोजन देखील विलंबाने झाल्याने व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर सन २०११-१२ मधील स्पील ओव्हरची रक्कम व या आर्थिक वर्षात हाती घेण्यांत आलेली कामे यांचा विचार करता , सन २०१२-१३ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजात बदल प्रस्तावित करुन रु.२१७७.६४ कोटीच्या सुधारित प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यांत आला व मा.महासभेने अंतर्गत फेरफार करुन रु.२१७७.६४ कोटी अर्थसंकल्पास मंजुरी दिली. हा अर्थसंकल्प मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ६३ मध्ये नमूद केलेली विविध कर्तव्ये लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला होता. परंतु आर्थिक वर्षातील सहा महिन्याचा कालावधी निघून गेल्यावर मा.स्थायी समिती गठीत झाल्याने व अंदाजपत्रकास नोव्हेंबर २०१२ मध्ये मा.महासभेची मंजुरी मिळाल्याने सर्व कामांच्या निविदा आता अंतिम होत असल्याने या वर्षातील खर्चाचे उद्दिष्ट पूर्ण करता येणें शक्य नाही.

## (अ ) सन २०१२ - १३ मधील अर्थसंकल्पीय अंदाजाचा संक्षिप्त आढावा :-

**जमा बाजू : -**

१. **जकात वसुली** : जकात कर हा महापालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्त्रोत आहे. जकात कर, मार्गस्थ दाखला व इतर शुल्क या पासुन रु.५६९.९५ कोटी उत्पन्न अपेक्षित करण्यात आले होते. परंतु महानगरपालिकेने इंधनावरील जकात करात कपात केल्याने व मार्गस्थ दाखला फी मध्ये केलेल्या दरवाढीस शासनाने मान्यता न दिल्याने रु. १७ कोटी उत्पन्न कमी प्राप्त होणार असल्याने **रु.५५२.९५ कोटी** सुधारित अंदाज अपेक्षित धरण्यांत आले आहेत.

२. **मालमत्ता कर** : मालमत्ता करापासून मूळ अंदाजपत्रकात रु.२०८.५६ कोटी व शासकीय कर व फी असे एकूण **रु. २५४.५८ कोटी** उत्पन्न अपेक्षित होते. सदरचे उत्पन्न प्राप्त करण्याचा प्रयत्न असून सुधारित अर्थसंकल्पात तेवढेच उत्पन्न अपेक्षित करण्यात आले आहे. मालमत्ता कर , शासकीय कर व फी असे मिळून मालमत्ता करापोटी एकूण **रु.२५४.९० कोटी** सुधारित अंदाज अपेक्षित धरण्यांत आले आहे.

३. **विकास व तत्सम कराची वसुली** : शहर विकास विभागाकडून विकास शुल्कापोटी येणारे उत्पन्न व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रेन्टल हौसिंग स्कीम अंतर्गत एम.एम.आर.डी.ए. मार्फत इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस म्हणून रु. ९० कोटी व शैक्षणिक भूखंड भाडे करारापासून रु. ३० कोटी अपेक्षित धरुन रु.३६८.२१ कोटी अपेक्षित केले होते. ठाणे शहरातील विकासकांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात

घेता व एम.एम.आर.डी.ए. कडून या आर्थिक वर्षात फक्त रु. १६ कोटीच प्राप्त होणार असल्याने तसेच शैक्षणिक भूखंड भाडे कराराच्या निविदेवर अद्याप कार्यवाही न झाल्याने शहर विकास विभागाच्या उत्पन्नामध्ये प्रथमच रु. १४६.२१ कोटीची मोठया प्रमाणात घट येत असल्याने **रु. २२२ कोटी** सुधारीत अंदाज अपेक्षित केले आहे.

**४. रस्ता खोदाई फी वसुली** : रस्ता खोदाई फी पासून रु.४० कोटी अपेक्षित केले होते. ते प्राप्त होणार असल्याने सुधारित अर्थसंकल्पामध्ये **रु.४० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**५. अग्निशमन विभागाकडील वसुली** : अग्निशमन विभागाकडून रु.२२.६२ कोटी मुळ अंदाजपत्रकात अपेक्षित धरण्यांत आले होते. अग्निशमन विभागाकडील दरामध्ये वाढ प्रस्तावित करुन सदरचे उत्पन्न अपेक्षित केले होते. सदर दरवाढीस मा. महासभेची नोव्हेंबर २०१२ मध्ये मंजुरी प्राप्त झाली असली तरी अपेक्षित उत्पन्न साध्य करण्यांचा प्रयत्न करण्यांत येत असल्याने सुधारीत अंदाज **रु.२२.७७** कोटी करण्यांत आले आहेत.

**६. पाणी पुरवठा आकार** : पाणी पुरवठा विभागाकडील दरामध्ये वाढ प्रस्तावित करुन पाणी पुरवठा आकारापासून रु.९९ कोटी अपेक्षित केले होते. परंतु मा. महासभेने प्रस्तावित वाढीव दर कमी करुन नोव्हेंबर २०१२ मध्ये मंजुरी दिल्याने अपेक्षित उत्पन्न साध्य होऊ शकणार नसल्याने उत्पन्न प्राप्तीसाठी कठोर उपाय योजना करण्यांत येणार असल्याने सुधारीत अंदाज **रु. ९० कोटी** करण्यांत आले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | **जाहिरात विभाग** | : | जाहिरात विभागाकडून रु.६.२५ कोटी उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले होते. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात होर्डींग, गॅन्ट्री , ॲडपोल, मोबाईल व्हॅन व युनिपोल यांच्या मार्फत मिळणारे सरासरी रु. १.५० कोटी रद्द झाल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सर्व जाहिरात फलक निविदांना मुदत वाढ देण्यांत येणार नसल्यामुळे **रु.५.११ कोटी** सुधारित अंदाज अपेक्षित करण्यांत आले आहेत. |
| ८. | **परवाना विभाग** | : | परवाना विभागाकडून रु. ६.५० कोटी उत्पन्न अपेक्षित केलेले उत्पन्न साध्य होऊ शकणार नसल्याने सुधारित अर्थसंकल्पामध्ये **रु. ३.२५ कोटी** उत्पन्न प्राप्त होईल असा अंदाज आहे. |
| ९. | **विशेष साफसफाई कर** | : | JNNURM अंतर्गत करण्यांत आलेला करारनामा तसेच घनकचरा व साफसफाईसाठी होणारा खर्च विचारात घेता ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व निवासी मिळकतींच्या करयोग्य मुल्यावर २% दराने व सर्व बिगर निवासी मिळकतीच्या करयोग्य मुल्यावर १०% दराने विशेष साफसफाई करवाढ दि.१.१०.२०१२ पासून लागू करण्यास मान्यता दिली असून अपेक्षित उत्पन्न साध्य होईल. |

## मागील तीन वर्षात प्रत्यक्ष प्राप्त झालेले महापालिका उत्पन्न : -

| वर्ष | प्रत्यक्ष प्राप्त महापालिका उत्पन्न (रुपये कोटीत ) |
|---|---|
| २००९-१० | **७४५.१८** |
| २०१०-११ | **९३२.११** |
| २०११-१२ | **१०७८.७३** |
| २०१२-१३ अपेक्षित | **१२१०.००** |

## सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज :-

( रु.कोटीत )

| तपशील | सन २०१२-१३ चे मूळ अंदाज | सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|
| महापालिका उत्पन्न | १३८७.०२ | १२१०.०० |
| अनुदान | ३०७.२९ | १४२.५७ |
| कर्ज | ३१५.२३ | ६९.५० |
| आरंभिची शिल्लक | १६८.१० | १८०.०० |
| **आरंभिच्या शिल्लकेसह एकूण** | **२१७७.६४** | **१६०२.०७** |

महापालिका उत्पन्नात येणारी तूट , JNNURM अंतर्गत प्रस्तावित अनुदान प्राप्त न झाल्याने व JNNURM अंतर्गत कामाची प्रगती पाहता कर्ज घेण्याची आवश्यकता नसल्याने जमा बाजूकडे महापालिका उत्पन्न रु. १२००.०० कोटी, अनुदान रु.१४२.५७ कोटी , कर्ज रक्कम रु.६९.५० कोटी व आरंभिची शिल्लक रु.१८० कोटी अपेक्षित करुन एकूण **रु. १६०२.०७ कोटी** सुधारित जमा बाजू प्रस्तावित करण्यांत येत आहे.

## खर्च बाजू :

१. **महसुली खर्च :** महसुली खर्चाचे अंदाज रु.८६६.७५ कोटी अपेक्षित होते. ते सुधारित मध्ये रु. ८३१.९९ कोटी करण्यांत आले आहेत.

२. **भांडवली खर्च** : भांडवली खर्चाचे अ अंदाजपत्रक व क अंदाजपत्रक मिळून रु.७९८.९४ कोटी अपेक्षित होते. परंतु सदर अंदाजपत्रकास उशीरा मंजुरी मिळाल्याने व निविदेच्या कामांना आता सुरुवात झाली असल्याने निविदेचा ३४% खर्च पुढील आर्थिक वर्षात पडणार आहे. त्यामुळे सुधारित अंदाज रु. ६७७.०९ कोटी करण्यांत आले आहेत.

३. **भांडवली खर्च JNNURM** : JNNURM अंतर्गत रु.५११.३२ कोटी मूळ अंदाजपत्रकात खर्चासाठी तरतूद करण्यांत आली होती. त्यामध्ये एकात्मिक नाले विकास प्रकल्प फेज I, II आणि III तसेच BSUP फेज II हे प्रकल्प पूर्ण करण्यांत आले व भुयारी गटार योजना फेज I, III हे प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत. भुयारी गटार योजना टप्पा II साठी रु. १३१ कोटी, भुयारी गटार योजना टप्पा IV साठी रु. २५ कोटी , BSUP फेज III साठी रु. ९८.७० कोटी व BSUP फेज IV साठी रु.९८.२२ कोटी , परिवहन बसेस खरेदीसाठी रु. ३९ कोटी तरतूद करण्यांत आली होती. यामध्ये भुयारी गटार योजना टप्पा II चा व भुयारी गटार योजना टप्पा IV चा डिपीआर केंद्र शासनाच्या मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून BSUP III & IV चे डिपीआर या आर्थिक वर्षात मंजूर झाल्याने सदर चारही योजनांवरील खर्च या आर्थिक वर्षात पडणार नसल्याने JNNURM अंतर्गत रु. ४१८.६१ कोटी भांडवली खर्च कमी करण्यांत आला आहे. सन २०१३-१४ मधील या योजना कार्यान्वित होऊन सदरचा खर्च होईल.

## सन २०१२-१३ चे खर्च बाजूचे सुधारित अंदाज :

(रु.कोटीत )

| अ.क्रं. | तपशील | सन २०१२-१३ चे मूळ अंदाज | सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली खर्च | ८६६.७४ | ८३१.९९ |
| २. | भांडवली खर्च अ+क अंदाज | ७९८.९४ | ६७७.०९ |
| ३. | भांडवली खर्च JNNURM | ५११.३२ | ९२.७० |
| ४. | एकूण भांडवली खर्च (२+३) | १३१०.२६ | ७६९.७९ |
| | **एकूण खर्च (१+४)** | **२१७७.००** | **१६०१.७८** |

अशा प्रकारे या आर्थिक वर्षात JNNURM अंतर्गत खर्च कमी होणार असल्याने तसेच केंद्र व राज्य शासन अनुदान व कर्जाची रक्कम कमी झाल्याने खर्चाचे सुधारित अंदाज रु.५७५.२२ कोटीने कमी झाले आहे. सदरचा सर्व स्पील ओव्हरचा खर्च पुढील आर्थिक वर्षात पडणार असून शक्यतो नवीन कामे हाती न घेता या आर्थिक वर्षाच्या अखेरीस मंजूरी मिळालेली कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील.

# (ब ) सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज :

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये प्रस्तावित केलेली ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

(रु. कोटीत )

| अ.क्रं. | तपशील | | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | आरंभिची शिल्लक | रु. | ०.२९ |
| २. | महसुली उत्पन्न | रु. | १३५७.०० |
| ३. | अनुदाने (जे.एन.एन.यु.आर.एम. व लाभार्थी हिस्स्यासह) | रु. | २३१.६० |
| ४. | कर्ज (जे.एन.एन.यु.आर.एम.सह ) | रु. | ३१५.५८ |
| | एकूण जमा (१ ते ४) | रु. | १९०४.४७ |
| ५. | महसुली खर्च | रु. | ९३४.३९ |
| ६. | अ अंदाज भांडवली खर्च | रु. | ५६६.७५ |
| ७. | क अंदाज भांडवली खर्च | रु. | ७१.३२ |
| ८. | जे.एन.एन.यु.आर.एम. भांडवली खर्च | रु. | ३३१.६० |
| ९. | अखेरची शिल्लक | रु. | ०.४१ |
| | एकूण अंदाजखर्च ( ५ ते ९ ) | रु. | १९०४.४७ |

# सदर अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये

१) ठाणे शहराच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत अमुलाग्र सुधार कार्यक्रमांतर्गत मिटरींग पध्दतीने पाणी पुरवठयाची अंमलबजावणी, प्रायोगिक तत्वावर २४X ७ पाणी पुरवठा व्यवस्था वर्तकनगरमध्ये सुरु करणे व ५ द.ल.लि. पाण्याचा पुनर्प्रक्रिया प्रकल्प कोपरी येथे सुरु करणे.

२) ठाणे महानगरपालिकेच्या पुर्व भागात मुंब्रा परिसरात व घोडबंदर परिसरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्था रिमॉडेलिंग करणे.

३) लाईट रेल ट्रान्झीट प्रकल्प

४) येऊर हिल पर्यटन विकासासाठी संपुर्ण आराखडा तयार करणे.

५) खाडी किनारा विकास प्रकल्प, शॅलो वॉटर पार्क वॉटर फ्रंन्ट विकास यामध्ये प्रथमतः शोकेस प्रकल्प म्हणून शहराच्या मध्यभागी असलेले ठाणे कॉलेज ते साकेत पर्यंतचा १.२३ कि.मी. लांबीचा खाडी परिसर सुशोभिकरण करणे.

६) ठाणे महानगरपालिकेतर्फे तयार करण्यांत आलेल्या पार्किंग धोरणानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रात पार्किंग सुविधा विकसित करणे.

७) अत्याधुनिक घनकचरा प्रकल्पाची (वेस्ट टू एनर्जी प्रक्रिया ) अंमलबजावणी

८) आतंरराष्ट्रीय दर्जाच्या मत्स्यालय प्रक्रल्पाची अंमलबजावणी

९) जी.आय.एस.आधारित संगणकीकृत डेटा बेसच्या सहाय्याने मालमत्ता कर व पाणी पुरवठा आकार वसुलीस प्राधान्य.

१०) ठाणे महापालिका हद्दीतील घोडबंदर रस्त्यावर चार ठिकाणी व पुर्वद्रुतगती मार्गावर दोन ठिकाणी पादचारी पुल तयार करणे.

११) कावेसर येथे बी.ओ.टी तत्वावर हेलिअम Tethered बलून उद्यान विकसित करणे.

१२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वातील ४८.५१ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे आधुनिक तंत्रज्ञान पध्दतीने डांबरीकरणाद्वारे पुर्नपृष्ठीकरण व मजबुतीकरण करणे.

१३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ४१ चौकांचे मास्टिक अस्फाल्ट पध्दतीने मजबुतीकरण करणे व अस्तित्वातील रस्त्यांचे ४१.४३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे युटीडब्ल्युटी पध्दतीने काँक्रीटीकरण करणे.

## पुर्ण झालेले प्रकल्प

१) विटावा आर.यु.बी. चे बांधकाम पुर्ण.

२) कळवा हॉस्पीटल समोर पादचारी पूल.

३) घोडबंदर सेवा रस्ता टप्पा क्र. १ मधील सिनेवंडर ते पातलीपाडा पर्यंत दोन्ही बाजुस सर्व्हीस सेवा रस्त्यांचे बांधकाम पुर्ण.

४) सन २०११-१२ मध्ये हाती घेण्यांत आलेल्या १३३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे डाबंरीकरणाचे काम प्रगतीपथावर व त्यापैकी ११९ कि.मी. रस्त्यांचे काम पुर्ण.

५) सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये हाती घेण्यांत आलेल्या २३.७० कि.मी. लांबीमध्ये रस्त्यांचे यु.टी.ड.ब्ल्यु.टी पध्दतीने काँक्रीटीकरण करण्याचे काम पुर्ण.

६) कळवा प्रभाग कार्यालय इमारतीचे बांधकाम पुर्ण.

७) राबोडी येथील शाळा क्र. ५१ चे वाढीव मजल्याचे बांधकाम पुर्ण.

**जमा बाजू :**

## सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **मालमत्ता कर** | : | मालमत्ता कर , करवसुली विभागाकडील फी व शासकीय कर मिळून एकूण **रु.२९९.३३ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| २. | **जी.आय.एस.मॅपींगद्वारे सर्व मिळकतींचे सर्व्हेक्षण** | : | सद्या ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींचे ग्राऊंड टुथींग व सर्व्हेक्षण करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे मिळकतीबाबतची सर्व माहिती GIS प्रणालीद्वारे उपलब्ध होणार असून नविन मालमत्तांचा शोध घेता येणार आहे. हा सर्व्हे केल्याने महापालिकेच्या महसुलात वाढ होणार आहे. आतापर्यंत २,४२,०२५ निवासी सदनिका /झोपडया तसेच मॉल, आय.टी.पार्क, शाळा, हॉस्पिटल, बँका, पार्कींग एरीया, कारखाने इत्यादींचे चे २१,०६,८०४ चौ.मी. क्षेत्राच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ७ प्रभाग समितींतील मालमत्तांचे सर्व्हेक्षण जवळ जवळ पूर्ण झाले असून, कळवा प्रभाग समितीतील ५०% व मुंब्रा प्रभाग समितीतील १०% मालमत्तांच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. नजिकच्या काळात सर्व्हेक्षणाद्वारे उपलब्ध झालेल्या मालमत्तांच्या माहितीच्या आधारावर मालमत्तां कराची बिले तयार करण्यांत येतील. |

**३. जकात / स्थानिक : संस्था कर**

महाराष्ट्र शासन स्तरावर अ,ब,क, वर्ग महापालिका क्षेत्रातील जकात कर रद्द करुन त्या ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करणेबाबतचा निर्णय प्रस्तावित असुन आपल्या महानगरपालिकेमध्ये पुढील वर्षात स्थानिक संस्था कर लागू होण्याची शक्यता आहे.

आजपर्यंत महापालिका हद्दीत उपभोग, उपयोग व विक्रीसाठी आयात होणाऱ्या मालावर जकात नाक्यावर जकात भरुन मालाची आयात केली जाते यामुळे जकात नाक्यावर वाहनांचा होणारा खोळंबा, आयातिकांचा जाणारा बहुमुल्य वेळ व पर्यायाने होणारी वाहतुकीची कोंडी यावर पर्याय म्हणून जकात कराच्या ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करणेकरीता महाराष्ट्र शासन स्तरावर प्रस्तावित आहे.

स्थानिक संस्था कर प्रणाली ही लेखा आधारित असून नाक्यावर वाहने थांबवून त्यांची वसुली केली जात नाही त्यामुळे हमरस्त्यावरील वाहनांचा खोळंबा हा जकात पध्दतीतील प्रमुख दोष टाळण्यात आला आहे. या प्रणालीत स्थानिक संस्था कर भरण्याची जबाबदारी उद्योजक व व्यापाऱ्यावर टाकण्यात आलेली असून एका आर्थिक वर्षातील सर्व खरेदी अथवा सर्व विक्रीच्या उलाढालीच्या विहीत मर्यादेच्या आधारे उद्योजक व व्यापाऱ्यांची स्थानिक संस्था कर नोंदणी बाबतची पात्रता ठरविली जाते. यामुळे वेळेची फार मोठी बचत होणार असून ठाणे शहरात व्यापार वृध्दींगत होण्यास मदत

मिळणार आहे. प्रत्येक उद्योजक व व्यापा-यांनी एका महिन्यात आयात केलेल्या मालाचे मूल्य स्वय:निर्धारण करुनच या कराचा भरणा चलनाव्दारे बँकेत करावयाचा आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील व्यापारी व उद्योजक संघटनाच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करुन स्थानिक संस्था कराबाबत तरतुदी व नमुने या बाबत सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणानंतर व्यापारी संघटनाच्या प्रतिनिधींना व व्यापा-यांना सुचना करण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार प्राप्त सुचनांचे निराकरण करण्यात आले आहे.

स्थानिक संस्था कर लागू झाल्यास जकात नाके राहणार नाहीत. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होणार नाही. जकात/ स्थानिक संस्था करापोटी **रु.६०७.०५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**४. जाहिरात :** जाहिरात करापोटी **रु. ५.३६ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**५. शहर विकास विभाग :** शहर विकास विभागाकडून **रु. २६२ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे.

**६. अग्निशमन दलाकडील फी :** महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार महापालिका हद्दीतील उंच रहिवाशी इमारती तसेच व्यावसायिक इमारतींच्या आराखडयांची अग्नि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून

अग्निशमन विभागामार्फत छाननी केली जाते अशा इमारतीना फायर प्रिमियम चार्जेस व फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस आकारण्यांस मा. महासभेने नोव्हेंबर २०१२ मध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार **रु.३०.६३ कोटी** उत्पन्न अपेक्षित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **७.** | **पाणी पुरवठा आकार** | : | पाणी पुरवठा आकारापोटी **रु. १०० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| **८.** | **रस्ता खोदाई फी** | : | रस्ता खोदाई फी पासून **रु. ३३ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| **९.** | **परवाना** | : | परवान्यापोटी **रु. ५.५० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| **१०.** | **बाजार फी** | : | बाजार फी पासून **रु.२.०० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| **११.** | **अनुदाने** | : | अ अंदाजपत्रकात रु.६२.५४ कोटी , JNNURM अंतर्गत प्रकल्पांसाठी १६९ कोटी असे एकूण रु.**२३१.६० कोटी** केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान अपेक्षित धरण्यांत आले आहे. |
| **१२.** | **कर्ज** | : | सन २०१२-१३ मध्ये कर्ज घेण्याची आवश्यकता भासणार नसली तरी, पुढील आर्थिक वर्षात अ अंदाजपत्रकात रु.१६८ कोटी , JNNURM अंतर्गत प्रकल्पांसाठी १४७.५८ कोटी असे एकूण **रु.३१५.५८ कोटी** कर्ज म्हणून जमेला धरण्यांत आले आहे. परंतु कामाची प्रगती व निधीच्या |

आवश्यकतेनुसारच कर्ज घेण्याचे प्रयोजन आहे. यामध्ये बी.एस.यु.पी. साठी हुडको या संस्थेकडून कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध होणार असल्याने आवश्यकता भासल्यास सदरचे कर्ज हुडको कडून घेण्यांत येईल.

**खर्च बाजू :**

**सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प / योजना :**

**१) नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण :**

**१.१ पाणी पुरवठा व्यवस्था : मिटरिंग पध्दतीने पाणी पुरवठा**

या वर्षापासुन सर्व प्रकारच्या नळ जोडणीवर मिटर बसविण्याची योजना सुरु करण्यांत येत आहे. त्यासाठी ठाणे महानगरपालिकेमार्फत AMR (ॲटोमेटीक मिटर रिडिंग) मीटर बसविणे व हाऊस कनेक्शन बदलणेसाठी रु. १७१.२१ कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल JNNURM खाली पाठविण्यांत आला आहे. यामध्ये पूर्ण ठाणे शहरातील ९२,०८० संयोजनांचा समावेश आहे. त्यापैकी २५६१७ संयोजनांवर जलमापके बसविण्याच्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या रु. ४७.६७ कोटी खर्चास मा.महासभेने मान्यता दिलेली असून याद्वारे सुमारे ६० % पाणी वापराचे मोजमाप करणे शक्य होईल. सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु केलेली आहे.

उर्वरित ६६,३६५ संयोजने बसविण्याचे प्रस्तावास JNNURM मार्फत मंजुरी मिळाल्यास त्यानुसार AMR मीटर बसविण्याचे काम हाती घेण्यांत येईल. AMR मीटर बसविल्यामुळे मीटर रिडींग ॲटोमेटिक घेण्यांत येणार असून त्यामुळे लागणा-या मनुष्यबळात बचत होणार आहे. तसेच

जलमापके बसविल्यामुळे अनावश्यक पाणी वापर व पाणी चोरीच्या वापरावर नियंत्रण येईल. नागरिकांमध्ये पाणी वापराबाबत जागरुकता निर्माण होऊन पाणी वापरानुसारच पैसे भरावे लागतील. जेणेकरुन पाणी वसुलीमध्येही वाढ होऊन NRW (Non revenue water ) कमी होणार आहे.

या आर्थिक वर्षात मीटर खरेदी या लेखाशिर्षाअंतर्गत **रु.१० कोटीं** तरतूद करण्यांत आलेली आहे.

**१.२ वितरण व्यवस्थेचा विस्तार व मजबुतीकरण :** ठाणे महानगरपालिकेच्या पुर्व भागात मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रासाठी वितरण व्यवस्थेचे रिमॉडलिंग करणेसाठी सन २०१२-१३ मध्ये रु. १२०.७४ कोटी इतक्या रकमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन JNNURM खाली निधी प्राप्त होणेसाठी पाठविण्यांत आला आहे. या प्रकल्पामध्ये १० जलकुंभ बांधणे, ४ संप व पंप हाऊस बांधणे, वहन व वितरण वाहिनी टाकणे या कामाचा प्रामुख्याने समावेश आहे.

तसेच उत्तर भागात वर्तकनगर व माजिवडा प्रभाग समिती क्षेत्रात रिमॉडलिंग करणेसाठी रु.४५३ .९२ कोटी खर्च अपेक्षित असून यापैकी रु. ३३४.२६ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल JNNURM खाली निधी प्राप्त होणेसाठी पाठविण्यांत आला आहे. तुर्त या लेखाशीर्षांतर्गत इतर अनुषंगिक कामांसाठी **रु.१८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१.३ विकास आराखड्यातील रस्ते :** ठाणे महानगरपालिका हद्दीतील घोडबंदर परिसर, कळवा, खारेगाव, कौसा, शीळ परिसर या भागांचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विकास योजनेअंतर्गत महत्वाचे

रस्ते हाती घेण्यांत आले असून, मागील वर्षात ३.७३ कि.मी. लांबीमध्ये रस्त्यांचे बांधकाम पूर्ण करण्यांत आले असून खारेगांव कळवा येथील २.१५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची बांधकामे ३१ मार्च २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात कळवा नाका ते आत्माराम पाटील चौक, कौसा- बायपास ते कल्याण शिळफाटा पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सेवा रस्ते , कळवा नाका ते विटावा ( ठाणे बेलापूर रस्ता ) व पुर्व द्रुतगती मार्गावरील माजिवडा नाका ते खारेगाव टोल नाक्यापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस सेवा रस्ते विकसित करण्याचे व वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत पोखरण रोड नं. १ व २ या रस्त्यांचे रुंदीकरण करण्याचे नियोजन आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विकास आराखडयातील रस्ते विकसित करणेकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यांत येत असून त्यांच्याकडून बाधीत बांधकाम, वाहतूक इ. चे सर्व्हेक्षण करुन प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही करण्यांत येईल. भुमिसंपादन व आराखडा तयार करणे बाबतची कार्यवाही पुर्ण केल्यानंतर रस्त्यांचे बांधकामाचे टप्प्या टप्प्यामध्ये नियोजन करण्यांत येईल.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ५ कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

१.४ **रस्ता रुंदीकरण/ नुतनीकरण** :

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील १३३ कि.मी. मुख्य रस्त्यांचे मजबुतीकरण व पुनर्पृष्ठीकरणाची कामे (आधुनिक तंत्रज्ञान

पद्धतीने ) तसेच एकूण २१ चौकांचे व वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत बॅरिस्टर नाथ पै रस्त्याचे २.७० कि.मी. लांबीमध्ये (सेमी रिजीट पेव्हमेंट) मास्टिक अस्फाल्टने मजबुतीकरण व रुंदीकरणाची कामे प्रामुख्याने हाती घेण्यांत आली आहेत.

पुनर्पृष्ठीकरण व मजबुतीकरणाद्वारे (सन २०११ -१२ कार्यक्रम) हाती घेण्यांत आलेल्या रस्त्यांपैकी ११९ कि.मी. लांबीचे रस्ते व २१ चौकांचे मास्टिक अस्फाल्ट पध्दतीने डांबरीकरणाची कामे ३१ मार्च २०१३ पर्यंत पुर्ण करण्यांत येणार आहेत. उर्वरित ८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे मजबुतीकरण माहे मे २०१४ पर्यंत पूर्ण होण्याचे उद्दिष्ट आहे. उर्वरित ६ कि.मी. रस्त्यांवर मलवाहिनी टाकण्याचे प्रलंबित असल्याने मलवाहिन्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याचे बांधकाम करण्यांत येईल. तसेच बॅरिस्टर नाथ पै रस्त्याचे बांधकाम प्रगती पथावर असुन जून २०१४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मॅक्रोसर्फेसींग या आधुनिक तंत्रज्ञान पध्दतीने दोन उड्डाणपुल व दोन चौकांचे प्रायोगिक तत्वावर पुनर्पृष्ठीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम हाती घेण्यांत आले असुन ३१ मार्च २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच सन २०१२-१३ मध्ये अस्तित्वातील ४८.५१ कि.मी. लांबीच्या १२२ रस्त्यांचे पुनर्पृष्ठीकरण व मजबुतीकरण व ४१ चौकांचे मास्टिक अस्फाल्ट पध्दतीने मजबुतीकरण करण्याची कामे हाती घेण्यांत येत असुन सदर रस्त्यांची कामे सन २०१३-१४ व २०१४-१५

मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ५० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.५ रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरण :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आतापर्यंत ६० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण पुर्ण करण्यात आले आहे. तसेच सन २०१०-११ मध्ये हाती घेण्यांत आलेल्या ०.६२ कि.मी. रस्त्याचे काम सन २०१२-१३ मध्ये पूर्ण करण्यांत आले आहे.

सन २०१२-१३ मध्ये २.१५४ कि.मी.लांबीच्या चार रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे हाती घेण्यांत आली असुन ही कामे सन २०१३-१४ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. १६ कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.६ यु.टी.डब्ल्यू.टी. पध्दतीने रस्ते काँक्रीटीकरण :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांचे यु.टी.डब्ल्यू.टी. या आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीने काँक्रीटीकरण करण्याचे प्रकल्प सन २००९-१० पासून हाती घेण्यांत आले आहेत. आतापर्यंत २९.१ कि.मी. रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण करण्यांत आले असून उर्वरित १.३ कि.मी. मे २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच सन २०१२-१३ या वर्षात एकूण ४१.४३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यांत आली असून सदरची कामे सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ४० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.७ मिसिंग लिंक :**

ठाणे महापालिका हद्दीतील घोडबंदर परिसरात मोठ्या प्रमाणावर निवासी व वाणिज्य संकुले विकसित होत आहेत. विकसित होत असलेल्या परिसरामध्ये रस्त्यांचे सुनियोजित जाळे विकसित होणे गरजेचे आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ८.२७ कि.मी. लांबीचे एकूण १० मिसिंग लिंक विकसित करण्याचा आराखडा तयार करण्यांत आला होता. त्यापैकी ५.९२ कि.मी. लांबीचे ६ मिसिंग लिंक हाती घेण्यांत आले असून ०.७३ कि.मी. लांबीच्या एका रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरीत पाच रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदरची कामे डिसेंबर २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात घोडबंदर परिसरातील उर्वरित २.३५ कि.मी. लांबीचे ४ मिसिंग लिंक विकसित करण्याचे प्रस्तावित आहे व वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात पोखरण रोड नं. १ व २ या रस्त्यांना जोडणारा शास्त्रीनगर नाका ते पोखरण रोड नं. २ हा रस्ता नव्याने विकसित करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. १० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.८ घोडबंदर सेवा रस्ते :**

घोडबंदर सेवा रस्त्याची एकूण लांबी ११.२ कि.मी. असून गोल्डन डाईज जंक्शन पासून ते सिनेवंडर पर्यंत (०.९ कि.मी. दोन्ही बाजूस ) सेवा रस्त्याचे बांधकाम एम.एस.आर.डी.सी. मार्फत करण्यांत येत असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच घोडबंदर सेवा रस्त्यांतर्गत टप्पा क्रमांक एक मध्ये सिनेवंडर मॉल ते पातलीपाडापर्यंत ६

कि.मी. लांबीच्या (३ कि.मी. दोन्ही बाजूस ) रस्त्यांचे दोन्ही बाजूकडील सेवा रस्त्याचे बहुतांशी बांधकाम पूर्ण करण्यांत आली असून उर्वरित रस्त्याचे बांधकाम मार्च २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच सदर सेवा रस्त्यामध्ये येणारे कल्व्हर्ट रुंदीकरणाचे काम MMRDA च्या निधीतून करण्यांत येणार असून सन २०१३ मध्ये हे काम पूर्ण करण्यांत येणार आहे.

दुस-या टप्प्यात घोडबंदर रोडवरील पातलीपाडा ते गायमुखपर्यंत उजवी व डावी बाजू (७.३ कि.मी. दोन्ही बाजूस ) सेवा रस्त्याचे बांधकाम MMRDA यांच्या निधीमधुन पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**१.९ पुलाचे रुंदीकरण व विकास :**

कळवा पुलावरील जेलकडील चौकाकडून राबोडी आकाशगंगा सोसायटीकडे जाणा-या रस्त्यावरील कमी रुंदीच्या पुलाचे रुंदीकरण करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आलेले असून, या ठिकाणी अतिरिक्त ७.५० मी. रुंदीचा पुल बांधण्यात येणार आहे. सन १३-१४ या वर्षात के व्हीला रोड व वंदना टॉकीज येथील अस्तित्वातील पुलाचे रुंदीकरण करण्याचे नियोजन आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. २.१० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.१० पार्कीग सुविधा उपलब्ध करणे (नविन प्रकल्प) :**

महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी पार्कीग सुविधा उपलब्ध करणेसाठी सन २०१२-१३ मध्ये पार्कीग धोरण तयार करण्यांत आले आहे. सदर धोरणा अंतर्गत रस्त्याव्यतिरीक्त पार्किंग सुविधा विकसित करण्यांत येणार असून रस्त्यावर पार्किंगचे सुनियोजीत लॉट तयार करण्यांत येतील. त्यात

अपंगांसाठी स्वतंत्र लॉटची व्यवस्था करण्यांत येणार आहे. रस्त्यांची चार प्रकारात वर्गवारी करण्यांत आली असुन निश्चित केलेल्या पार्किंग शुल्का प्रमाणे वसुली करण्यांत येईल. तसेच पार्किंग नियमाचा भंग करणा-या विरुध्द दंडात्मक / कायदेशीर कारवाई करण्यांत येतील.

पार्किंग धोरणांतर्गत महापालिका क्षेत्रात १७७ रस्त्यांवर एकूण ४५७१ दुचाकी, २२४२ तीन चाकी (रिक्षा), २७०३ कार, जिप, टॅक्सी व ३३५ बस , ट्रक अशा एकूण ९८५५ वाहनांसाठी पार्किंग लॉट तयार करण्यांत येणार आहे. पार्किंग लॉट तयार करणे व अनुषंगिक कामासाठी ४.७४ कोटी इतका भांडवली खर्च येणार आहे. सदरच्या पार्किंग धोरणाची अंमलबजावणी महापालिकेमार्फतच करण्यांत येणार असुन आवश्यक त्या मनुष्यबळाची कंत्राटावर नव्याने नियुक्ती करण्यांत येईल. सदर मनुष्यबळ व अनुषंगिक बांबींपोटी रु.१०.०७ कोटी इतका वार्षिक खर्च अपेक्षित असुन पार्किंग शुल्क वसुलीपोटी रु.१८.९० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

पार्कींग धोरण राबवितांना बिलिंग मशीन वापरण्यांत येणार असून टप्प्याटप्प्यात बिलिंग मशीनमध्ये GPRS प्रणाली बसवून संपूर्ण पार्कींग डाटाचे संगणकीकरण करण्यांत येईल. सदर माहितीचे विश्लेषण करुन प्रत्येक रस्त्याच्या दोन्ही बाजूस डिस्प्ले बोर्ड पार्कीसाठी उपलब्ध असलेल्या जागेबाबतची अद्ययावत माहिती दर्शविण्यांत येईल. तसेच मोबाईल ॲप्लीकेशन द्वारेही पार्कींग बाबतची अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्यांत येईल तसेच पार्कींग शुल्क देखील मोबाईल द्वारे

भरण्याचीही सुविधा उपलब्ध करुन देण्यांत येईल. सदरच्या योजना टप्प्याटप्प्यात राबविण्यांत येणा आहे.

पार्किंग धोरणास सर्व साधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात पार्किंग लॉट तयार करणेची कार्यवाही करण्यांत येईल.

सन २०१२-१३ या वर्षामध्ये महापालिका मुख्यालयासमोर जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावरील परमार्थ निकेतन समोर रायगड आळी हा रस्ता असुन सदर रस्ता व त्यालगतचा कचराळी तलाव परिसर या भागातील नाला बंदिस्त करुन तळ अधिक पहिला मजला असे स्टॅक पार्कीग करण्याची कामे हाती घेण्यांत आली आहेत.

सदर ५० मी. लांबीच्या भागात दोन पातळयांत ३० चार चाकी हलक्या वाहनांसाठी स्टॅक पार्कीग उभारण्यांत येईल व सदर स्टॅक पार्कीग उभारणा-या संस्थेमार्फत अथवा स्वतंत्रपणे पार्कीगचे परिचलन करण्याची कार्यवाही करण्यांत येणार आहे. सदरचे काम सन २०१३-१४ मध्ये पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पार्कीग सुविधा उपलब्ध करणेसाठी **रु. ३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत्या वर्षी जकात कराऐवजी स्थानिक संस्थाकर लागू होण्याची शक्यता आहे. जकात बंद झाल्यास अस्तित्वातील जकात नाक्यांची जागा व इमारती रिकाम्या होणार असल्याने सदर रिकाम्या जागेचा पर्यायी जागा म्हणुन **ट्रक / बस टर्मिनस** उभारण्याचे नियोजन आहे. या अंतर्गत आनंद नगर जकात नाका, गायमुख जकात

नाका, खारेगांव जकात नाका व डायघर जकात नाका येथील जागेमध्ये **ट्रक / बस टर्मिनस** उभारणेकरीता सर्व्हेक्षण व आराखडे तयार करुन त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. १.३० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**१.११ विटावा RUB :**

ठाणे - बेलापूर रस्त्यावर विटावा येथे असलेल्या RUB चे रुंदीकरण करण्याच्या दृष्टिने Box pushing पध्दतीने अतिरिक्त ७ मी. रुंदीचे काम जुन २०१२ मध्ये पुर्ण करण्यांत आले आहे. तसेच अस्तित्वातील RUB खालील रस्ता मोठया प्रमाणात खराब झाला असल्याने त्याचे नुतनीकरणाचे काम हाती घेण्यांत आले आहे. सदरचे काम मे २०१३ पर्यंत पुर्ण करण्यांत येणार असुन त्यामुळे वाहतुक कोंडीच्या प्रमाणात लक्षणीय घट होणार आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु.१ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

**१.१२ पादचारी पूल (नवीन प्रकल्प) :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातून पुर्वद्रुतगती मार्ग, जुना मुंबई राष्ट्रीय महामार्ग, घोडबंदर रस्ता हे प्रमुख मार्ग जात असून सदर मार्गावरील मोठया प्रमाणातील वाहतुक वर्दळीमुळे पादचा-यांना रस्ता ओलांडणे असुरक्षित झाले आहे. म्हणुन पादचा-यांच्या सोईसाठी पुर्वद्रुतगती मार्गावर दोन ठिकाणी व घोडबंदर रस्त्यावर चार ठिकाणी पाचारी पुल बांधण्यास मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घोडबंदर रस्त्यावर दहा ठिकाणी पादचारी पुल ५०:५० टक्के कॉस्ट शेअरींग बेसिसवर बांधण्याची तयारी दर्शविली आहे. त्यानुसार महापालिकेच्या हिस्स्याच्या पाच

पादचारीपुलापैकी चार पादचारी पुलास यापुर्वीच मा. महासभेने मान्यता दिलेली असुन सदरच्या पादचारी पुलांचे सर्व साधारण आराखडे तयार करतांना सार्वजनिक इमारती, मॉल, प्रस्तावित एल.आर.टी, मेट्रोचे स्टेशन यांचा एकत्रित विचार करण्यांत येईल. त्यामुळे पादचारी पुलांचा जास्तीत जास्त उपयोग होईल. सदर पुलांचे आराखडे व संकल्पन वैशिष्टपुर्ण करण्यांत येऊन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन बांधण्यांत येतील. सदर पादचारी पुलांमुळे शहराच्या सौदर्यात भर पडेल. पादचारी पुलांसाठी जिन्या ऐवजी रॅम्प बांधण्यांत येतील. पुर्वद्रुतगती मार्गावर दोन ठिकाणी पादचारी पुल बांधण्याची निविदा प्रक्रिया सुरु करण्यांत आली असुन सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात घोडबंदर रस्त्यावरील पादचारी पुलांचे संकल्पन करुन कामे हाती घेण्याचे नियोजन केले आहे.

तसेच विटावा येथे बेलापूर रोडवर मोठया प्रमाणात अवजड वाहतूक होत असल्याने पादचा-यांच्या सोईसाठी पादचारी पूल बांधण्यांत येईल. मागील वर्षात छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासमोर पादचारी पूल बांधण्यांत आला असून विटावा RUB खाली पादचा-यांसाठी सुसज्ज व स्वतंत्र मार्गीका तयार करण्याचे काम सुरु आहे. वरील पादचारी पूल बांधल्यानंतर सदर परिसरात पादचा-यांना सर्व प्रकारचे सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. १० कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

**१.१३ कळवा खाडीवर पूल :** कळवा खाडीवर वाहतुकीचे प्रमाण पाहता नवीन पूल बांधणे आवश्यक आहे. या ठिकाणी अस्तित्वातील पुलाच्या उत्तर बाजूस सुमारे २०० मीटर अंतरावर नवीन पूल बांधण्यांत येईल व दोन्ही पूल वापरुन एक दिशा मार्ग वाहतुकीसाठी लूप तयार करण्यांत येईल. जेणेकरुन याठिकाणी वाहतुक कोंडी होणार नाही. या पुलाच्या बांधकामासह कळवा चौक ते खारेगांव खाडीलगत या डि.पी.रस्त्यापैकी सी.आर.झेड मध्ये येणारा १.८ कि.मी. रस्ता विकसित करण्यांत येईल.

सदर बाबत सल्लागाराची नेमणूक करुन आराखडे तयार करुन सी.आर.झेडची मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यांत येईल. यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**१.१४ उड्डाणपूल बांधणे :** पुर्वद्रुतगती मार्गावरील आनंदनगर ते घोडबंदर रस्त्यावरील मानपाडा या भागात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने व या भागात उड्डाणपूल असूनही चौकात वाहतूक कोंडी होत असल्याने सदर परिसरातील वाहतुकीचे सविस्तर सर्व्हेक्षण करुन वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी सुयोग्य प्रकल्प सुचविणे यासाठी तज्ञ सल्लागार नेमणुकीची कार्यवाही सुरु आहे. त्यांच्या अहवालानुसार एकात्मिक प्रकलप राबविण्यांत येईल. त्यामध्ये रेल्वे लाईनमुळे विभागलेले कोपरी पुल येथील सर्व्हीस रस्ता जोडणेबाबतचा प्रकल्प हाती घेण्यांत येईल. सदर कामामुळे तीनहात नाका येथील वाहतुक कोंडी कमी होईल. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ५० लक्ष** तरतूद करण्यात आलेली आहे.

**१.१५ मुंब्रा स्टेशन परीसर सुधारणा (नवीन प्रकल्प) :** मुंब्रा रेल्वे परीसर सुधारणा हा कार्यक्रम ३० मे २०१२ रोजी हाती घेण्यांत आला. मुंब्रा रेल्वे स्टेशनकडे रेतीबंदर कडून जाताना तसेच कौसा भागाकडून जाताना एकूण ११८ पक्क्या स्वरुपाचे गाळे रेल्वेच्या जागेमध्ये होते. सदर जाळे तोडण्याची संयुक्त कारवाई करण्यांत आली व सुमारे १.५ एकर इतका परिसर मोकळा करण्यांत आला आहे.या अंतर्गत स्वतंत्र रिक्षा तळ (८ मार्गीक), रिक्ष प्रवाशी स्टॅन्ड, मंदीर, सार्वजनिक शौचालय स्थलांतर, पदपथ, बस स्थानक, पुलाखालील हॉकर्स हटविणे इत्यादी व्यवस्था अद्ययावत केलेली आहे. याकरीता खासदार निधी रु.५२ लक्ष, महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक बहुल वस्ती सुधारणा निधी रु.१.२६ कोटी व महापालिका निधीमधून रु. ५ कोटी खर्च करण्यांत आला असून उर्वरित कामांसाठी **रु. ५० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**१.१६ कळवा रेल्वे स्टेशन परिसर सुधारणा (नवीन प्रकल्प) :** येत्या वर्षी कळवा स्टेशन परिसर सुधारणेची योजना हाती घेण्यांत येईल. कळवा रेल्वे स्टेशन परिसराच्या सुधारणेसाठी **रु. ३ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

## २ सामाजिक पायाभूत सुविधा :

**२.१ भूसंपादन :** भूसंपादनासाठी **रु.४५ कोटीची** तरतूद करण्यांत आली आहे. सदर निधिचा विनियोग विकास आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी करण्यांत येईल.

**२.२ ठाणे महानगरपालिका क्षेत्राची सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत (नवीन प्रकल्प) :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्येतील वाढ अपुऱ्या सुविधा, वाहतुक व्यवस्था, पर्यावरण कायदयामधील विविध बदल, घराच्या मागणीतील वाढ, रस्ते, पुल, पाणी, मलःनिस्सारण, सी..आर.झेड. कायदयामधील तरतुदी व त्यामुळे सुविधा , बांधकामांवर येणारे बंधन, तिवरांच्या जंगलांचे संवर्धन, खाडीचे संवर्धन, वॉटर ट्रान्सपोर्ट इत्यादी आधुनिक अनुषंगिक विचार करून विकास योजना तयार करणेस तसेच जागतिक पातळीवर सुधारलेल्या शहरांशी तुलना करून अशा प्रकारच्या विकास योजना तयार करण्याचा अनुभव असणाऱ्या संस्थेकडून स्वारस्य प्रकटन (EOI) मागविणेस मा. महासभेची मान्यता मिळालेली असून, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर सुधारीत विकास योजना तयार करण्याच्या कामासाठी सन २०१२ - १३ च्या अर्थसंकल्पात रु. १० लाख व सन २०१३ - १४ मध्ये **रु. ५० लक्ष** इतकी तरतुद करण्यात आली आहे.

**२.३ प्रभाग कार्यालय बांधणे :**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात कळवा येथील प्रभाग कार्यालयांच्या नवीन इमारतीचे (तळ + तीन ) बांधकाम हाती घेण्यांत आले असून, सदरचे बांधकाम मार्च २०१३ मध्ये पुर्ण करण्यांत येत आहे. इमारती अंतर्गत फर्निचर, सजावट इ. कामे हाती घेण्यांत येत असुन जून २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असुन सदरची इमारत प्रशासकीय व नागरीकांसाठी उपलब्ध होणार आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

**२.४ इमारत बांधणे**

या आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयातील अस्तित्वातील इमारतीमध्ये दुसरा मजल्याचे वाढीव बांधकाम हाती घेण्यांत आले असुन सदर वाढीव मजल्याचे बांधकाम प्रशासकीय वापरासाठी करण्यांत येणार आहे.

सन २०१३-१४ या वर्षात वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.७ मध्ये निळकंठ पाम येथील आरक्षित भुखंडावर बहुउद्देशिय इमारत विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर इमारतीमध्ये कम्युनिटी सेंटर, व्यायामशाळा, वाचनालय इ. बाबींचा समावेश असणार आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

**२.५ मार्केट बांधणे** :

नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत गांवदेवी मार्केटचे पुर्नविकास व पुर्नबांधणीचे काम सन २०११-१२ या वर्षात हाती घेण्यांत आले असुन सदर कामाअंतर्गत पार्किंगसह बेसमेंट, तळमजला अधिक दोन मजले बांधकामाचा समावेश आहे. सद्यस्थितीत या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असुन एप्रिल २०१३ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु.२.५० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**२.६ दवाखाने बांधणे** :

माजिवडा - मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत ढोकाळी येथे तळ अधिक एक मजला रुग्णालयाचे बांधकाम हाती घेण्यांत आले असून, सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु.२कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

मौजे वडवली व मौजे पांचपाखाडी येथील श्रीनगर येथे प्रसुतीगृहाचे आरक्षण विकासकाकडून विकसित करून घेण्यात येत आहे.

**मुंब्रा येथे १०० खाटांचे रुग्णालय उभारणी करणे :**

मुंब्रा कौसा येथे १०० खाटांचे सर्व सुविधायुक्त रुग्णालय यामध्ये सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया एक्सरे,सोनोग्राफी, एनआयसीयु, पीआयसीयु, अपघात कक्ष इत्यादी सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. सदरचे हॉस्पिटल अल्पसंख्यांक बहुल विकास निधीमधून करण्याचे प्रस्तावित आहे.

**२.७ कत्तलखाना बांधणे :** उथळसर प्रभाग समितीअंतर्गत राबोडी येथे अद्ययावत कत्तलखाना बांधकाम सन २०११-१२ या आर्थिक वर्षात हाती घेण्यांत आले असुन सदरचे बांधकाम प्रगती पथावर असून जानेवारी २०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील कौसा येथे बीओटी तत्वावर अद्ययावत कत्तलखाना उभारणी करण्याचे नियोजित आहे.

सदर कामांतर्गत जनावरांची कत्तल केल्यानंतर टाकाऊ अवशेषांचे ई.टी.पी. मार्फत योग्यरित्या रासायनिक प्रक्रिया करुन पाणी नाल्यात सोडण्यात येईल, जेणेकरुन नाल्यात कोणत्याही प्रकारचा दुषित पाण्याचा निचरा होणार नाही. अशा प्रकारे नैसर्गिक स्त्रोतांचे व वातावरणातील प्रदुषण कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल. यासाठी **रु. ५० लक्ष** तरतुद करण्यात आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २.८ | **शाळा बांधणे** | : | विष्णूनगर , नौपाडा व येथील वाढीव मजल्याची बांधकाम प्रगतीपथावर असून , राबोडी शाळा क्रमांक ५१ चे बांधकाम पूर्ण झाले असून अनुक्रमे २१ व ६ वर्गखोल्या उपलब्ध होणार आहेत. तसेच सन २०११-१२ मध्ये विटावा (स्टील्ट अधिक चार मजले) व कौसा (तळ अधिक चार मजले) येथे शाळेचे बांधकाम हाती घेण्यांत आले असून, सदरचे बांधकाम प्रगतीपथावर असुन सन २०१३-१४ मध्ये पुर्ण करण्याचे नियोजन आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ३ कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे. |
| २.९ | **शाळा दुरुस्ती** | : | ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ८५ शाळा इमारती असून त्यापैकी सन ११-१२ वर्षामध्ये ४५ शाळांची दुरुस्ती पूर्ण करण्यांत आली असून १२-१३ या वर्षामध्ये ३६ शाळांची दुरुस्ती हाती घेण्यांत आली असून पुढील आर्थिक वर्षात हे काम पूर्ण करण्यांत येईल. दुरुस्ती अंतर्गत प्रामुख्याने स्थापत्य कामे, पाण्याची व्यवस्था, शौचालयाची व्यवस्था ,वॉटर प्युरिफायर, अग्निशमन यंत्रणा, कूपनलिका इत्यादी कामांचा समावेश आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ४.५० कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे. |
| २.१० | **नाईट शेल्टर / संक्रमण शिबीर बांधणे** | : | या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ४ कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे. |
| २.११ | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना** | : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत महापालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट प्रकारचे काम विचारात घेऊन ज्यांची सेवा २५ वर्षे किंवा |

त्यापेक्षा जास्त झाली आहे, अशा सफाई कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचे वेळी किंवा सफाई कर्मचा-यांचा सेवेत मृत्यू झाल्यास अशा कर्मचा-यांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिकेकडून शासन आदेशानुसार सदनिका देणेबाबत निर्देश असल्याने महापालिकेने प्राधान्याने भाईंदरपाडा येथे २३४ सदनिका व माजिवडा येथे ५६ सदनिका याप्रमाणे एकूण २९० सदनिका (२६९ चौ. फुट चटईक्षेत्र असलेल्या ) बांधणे व पायाभुत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरु केले आहे.

महापालिकेतील सन २००९-२०१८ पर्यंतच्या - पुढील १० वर्षात ४०१ सफाई कामगार निवृत्त होणार आहेत., त्यापैकी शासन निर्णयानुसार सेवा निवृत्तीच्या वेळेस २५ वर्षे सेवा पूर्ण होणा-या एकूण ३१३ निवृत्त सफाई कामगारांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

सद्यस्थितीत दोन्ही ठिकाणी काम सुरु असून सदर सदनिकांचे बांधकाम ( पायाभूत सुविधांसह ) माहे मे २०१३ पर्यंत पुर्ण करुन पात्र सफाई कामगार किंवा त्यांचे पात्र वारसदार यांना कायमस्वरुपी हस्तांतरण करण्याचा महापालिकेचा मानस आहे. तसेच उर्वरित २३ सफाई कामगारांसाठी निवासाची व्यवस्था भविष्यात करण्याचे नियोजन आहे. या लेखाशिर्षकांतर्गत **रु. ६ कोटी** तरतुद करण्यात आलेली आहे.

**२.१२ मत्स्यालय बांधणे (नवीन प्रकल्प) :** बांधा वापरा व हस्तांतरित करा (BOOT) धर्तीवर ज्युपिटर हॉस्पीटलच्या शेजारी पब्लिक ॲमेनिटीच्या जागेवर अद्ययावत मत्स्यालय बांधणे नियोजित असून, दोन विकासक संस्था

महापालिकेकडे स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मार्फत आलेल्या आहेत. या कामाकरीता ट्रान्झेक्शन ॲडव्हायझरची नेमणूक करण्यांत आली असून त्यांचेकडून प्राईज बिड अंतिम केल्यानंतर एका विकासकाची निवड करुन त्यांचेकडून BOOT तत्वावर पुढील तीन वर्षात बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पातुन महानगरपालिकेला भविष्यात उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. यासाठी **रु. १० लक्ष** प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

**२.१३ राजीव आवास : योजनेच्या माध्यमातून झोपडपट्टी शहर नियोजन**

ठाणे महानरगपालिका क्षेत्रात बीएसयुपी प्रकल्प उत्तम रितीने राबविला गेलेला असल्यामुळे देशपातळीवर ठाणे महानगरपालिकेकडे उत्कृष्ट प्रकल्प राबविणारी महापालिका असा केंद्र शासनाचा दृष्टिकोन आहे. सन २०१२-१३ मध्ये हुडको या संस्थेने सर्वांगीण विकासाचे पारितोषिक देऊन सदर बाबीस पुष्टी दिलेली आहे. म्हणूनच केंद्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मध्यभागी असलेले ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त होणेसाठी पायलट सिटी म्हणून राजीव आवास योजनेकरीता निवड केलेली आहे.

ठाणे महानगरपालिकेने राजीव आवास योजनेकरीता काम सुरु केले असून झोपडपट्टयांचे जीआयएस मॅपींग व त्यानुसार जीआयएस कोडींग, प्लेनटेबल सर्व्हेक्षण, सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षण ७५% पर्यंत पुर्ण केलेले आहे.

ठाणे महानगरपालिकेने मार्गदर्शक प्रकल्प अहवाल - खारटन वसाहत, राबोडी - १ भाग, आनंदनगर, कोपरी शासनाकडे सादर केलेले आहेत.

मंजूर विकास आराखडयात काही बदल तसेच स्लम चा टीडीआर हा वॉटरफ्रंट सारख्या हाय डेनसिटी कॉरिडॉर येथे नेणे या सर्व इनोव्हेटीव्ह प्रकारास महानगरपालिकेने मान्यता दिली असून पुढील कार्यवाही होणेसाठी महापालिका प्रशासन कटिबध्द आहे. यासाठी **रु. ३० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**२.१४ कौसा प्रादेशिक : क्रिडा संकुल**

कौसा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फुटबॉल स्टेडीयम व ४०० मी. लांबीच्या ८ मार्गिकेचा सिंथेटीक ट्रॅक, ऑलिंपिक साईज तरण तलाव, लॉन टेनिस, कबड्डी, खो- खो, भाला फेक, लांब उडी, उंच उडी, पोल व्हॉल्ट, गोळ फेक, थाळी फेक, जॉगिंग ट्रक, या मैदानी खेळांची तसेच इनडोअर खेळांच्या इमारती अंतर्गत बॅडमिंटन,टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, इत्यादी खेळांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

क्रिडा संकुलाचे ६०% काम पुर्ण झाले असून, डिसेंबर २०१३ पर्यंत उर्वरीत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशिर्षकांतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात **रु.६.५०** कोटी तरतुद करण्यात आलेली आहे.

वरील कामांशिवाय पी.पी.पी. माध्यमातून एक नवीन इमारत बांधून त्यामध्ये नागरिक व खेळांडूसाठी क्लब हाऊस, रेस्टॉरंट ,पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा , खेळाडू व पाहुण्यांसाठी अद्ययावत राहण्याची सोय, प्रकल्पाचे देखभाल कार्यालय इत्यादी बाबींचा समावेश राहील असे नियोजन आहे.

**२.१५ मिनी स्टेडीयम बांधणे :** सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ढोकाळी माजिवडा येथे मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्सचे बांधकाम हाती घेण्यात आले असून, त्याच्या बांधकामाचा खर्च खासदार निधी मधून करण्यात येणार आहे.

**२.१६ दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह :** दादोजी कोंडदेव स्टेडीयम येथे चालु आर्थिक वर्षामध्ये टेबल टेनिस रुम, बिलीयर्ड रुम, स्क्वैश कोर्ट यांचे नुतनीकरण करण्यांत आलेले आहे. तसेच लॉन टेनिस कोर्ट ही बनविण्यांत आलेले आहे. याशिवाय स्टेडीयम मधील व्यायामशाळेचे पुर्णतः नुतनीकरण करुन सर्व व्यायाम साहीत्यासह व्यायामशाळा वापरा करीता सुसज्य बनविण्यांत आलेली आहे.

पुढील आर्थिक वर्षामध्ये स्टेडीयम मधील ब्रिज रुम, कॅरम रुम याबरोबरच बार रुम व कॅन्टीनचेही नुतनीकरण करण्याचा मनास आहे. तसेच खंडु रांगणेकर बॅडमिंटन हॉल येथे अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू सराव करीत असल्याने बॅडमिंटन हॉलचे जुने फ्लोअरींग बदलून त्याठिकाणी आतंरराष्ट्रीय दर्जाचे वुडन फ्लोअरींग बसवून संपुर्ण बॅडमिंटन हॉलचे नुतनीकरण करण्यांत येईल. सदर कामाकरीता पुढील आर्थिक वर्षामध्ये **रु.२.०० कोटी** एवढी आर्थिक तरतूद करण्यांत येईल.

## ३. शहर पर्यावरणामध्ये सुधारणा :

**३.१ हरित ठाणे प्रकल्प :** नागरीकांना विरंगुळयासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरात उद्यानांची नितांत आवश्यकता आहे. ठाणे शहराच्या सध्याच्या लोकसंख्येचा विचार करता उद्यानांचे विकसिकरण करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ठाणे शहरात अस्तित्वातील उद्याने व वृक्षलागवड यांची शास्त्रोत पध्दतीने निगराणी करणे व नव्याने उद्यान विकसित करणे, अस्तित्वातील उद्याने, चौक, रस्ते दुभाजक, हरित पट्टे, आयलॅण्डस् यामध्ये हिरवळ व शोभेच्या झाडांची लागवडीसह निगा-देखभाल करण्यात येत असून सन २०११-१२ पासून हरित ठाणे प्रकल्प राबविण्यात येत आहे. मौजे कावेसर सेक्टर ६ गार्डन आरक्षण क्र.८ येथील ७ एकर भुखंडावर थीमपार्क .मोजे कोलशेत, सेक्टर ५, पार्क क्र.८, घोडबंदर रोड, पातलीपाडा येथील ५.२५ एकर भुखंडावर बोटॅनिकल गार्डन, मुल्ला बाग निसर्ग उद्यानाचे नुतनीकरण व सुशोभिकरण , कावेसर येथे बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर Hellium Tethered Balloon उद्यान , रस्त्याच्या दुतर्फा हरित पट्टे, नागरी वनीकरणाद्वारे शीळ येथील वृक्षांचे संवर्धन, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड , विकसित करण्यात आलेली उद्याने, चौक, रस्ते दुभाजक, हरित पट्टे व आयलॅण्डस् यांची शास्त्रोक्त पध्दतीने निगा-देखभाल, अस्तित्वातील उद्यानांचे आवश्यकतेनुसार सुशोभिकरण, नव्याने उद्यान विकास करणे.अस्तित्वातील उद्यानांची आवश्यकतेनुसार व नविन संकल्पना आराखडयानुसार स्थापत्य कामे करणे आणि

अद्ययावत खेळणी बसविण्यासह नुतनीकरण करणे तसेच अस्तित्वातील उद्यानांमध्ये आवश्यकतेनुसार विद्युत दिवे बसविणे. या सर्व कामांकरीता उद्याना विभागासाठी एकूण **रु.१०.२० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३.२ उद्यान विकास : बोटॅनिकल गार्डन विकसित करणे:**

मौजे कोलशेत, सेक्टर ५,पार्क क्र. ८ घोडबंदर रोड,पातलीपाडा या भुखंडावर बोटॅनिकल गार्डन विकसित करणे प्रस्तावित असून त्यापैकी ६.२५ एकर जागा विकासकाच्या माध्यमातून ठामपाच्या ताब्यात आली आहे. त्यापैकी अंदाजे १ एकर जागेवर ३५० विविध जातीची वृक्ष लागवड, परगोला, लॉनची लागवड इ. कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित ५.२५ एकर जागेवर बोटॅनिकल गार्डन विकसित करण्याचे काम चालू आहे. त्याचप्रमाणे एकूण क्षेत्रफळापैकी १९.२५ एकर क्षेत्रफळाची जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही शहर विकास विभागाकडून सुरु आहे.

**वाघबीळ येथे थीम पार्क विकसित करणे:** थीमपार्कमध्ये लालमातीचा भर देणे व हिरवळ लावण्याचे फेज-१ चे काम पूर्ण झाले आहे.

**मुल्लाबाग येथील निसर्ग उद्यानाचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे:** सन २०१२-१३ मध्ये फेज-१ चे हिरवळ लावणे व सुशोभिकरण करणेचे काम पूर्ण झाले असून

सन २०१३-१४ मध्ये फेज-२ साठी उद्यान सुशोभिकरणासाठी **रु.४० लक्ष** तरतूद करण्यांत आली आहे.

**कावेसर येथील बी.ओ.टी तत्वावर हेलीअम Tethered बलून उद्यान विकसित करणे:** हे काम मुल्लाबाग येथे करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. मात्र सदरचे काम मौजे कावेसर येथे करण्याचे निश्चित झाल्याने नव्याने निविदा मागवून कार्यवाही करण्यांत येत आहे.

**कळवा खाडीलगतच्या जागेवर उद्यान विकसित करणे:**

कळवा खाडीलगत अंदाजे २ एकर क्षेत्रफळाच्या जागेवर राशी नक्षत्र उद्यान विकसित करण्याचे काम करण्यात येत आहे.

**३.३ वृक्षप्राधिकरण :**

सन २०१२-१३ मध्ये करारनाम्याद्वारे वन विभागामार्फत मौजे शिळ येथील ५० हेक्टर क्षेत्रफळाची जागा सात वर्षाकरीता वृक्षारोपाणासाठी घेण्यात आली असून त्यावर एकूण २४००० स्थानिक प्रजातीची लागवड करण्यांत आली असून त्याची दैनंदिन देखभाल करण्यांत येत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील रस्त्याच्या दुतर्फा ३००० वृक्षांची लागवड करुन निगा देखभाल करण्यात येणार आहे. झाडे लावणे व त्यांची निगा, बागांची निगा व देखभाल आणि सुरक्षेसाठी **रु.५.५० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**३.४ हरित जनपथ विकास प्रकल्प :**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात सुमारे ४२ कि.मी. लांबीचे जनपथ विकसित करणेचे हाती घेण्यांत आले असुन

सदरचे काम सन २०१३-१४ मध्ये पुर्ण करण्योच नियोजन आहे.

शहरातील सुमारे ७१ रस्त्यांवर रोड फर्निचरची अनुषंगिक कामे करणे व ११.३० कि.मी. लांबीचे लोखंडी संरक्षक रेलिंग बसविण्याच्या कामांसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यांत आल्या असून सन २०१३-१४ पर्यंत सदरची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ४० कि.मी. लांबीमध्ये जनपथ विकसित करण्याचे नियोजन असून याकरीता **रु. ४० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**३.५ एकात्मिक तलाव : सौंदर्यीकरण**

ठाणे शहर हे तलावांचे शहर असल्याने तलावांचे संवर्धन व जतन करणे आवश्यक असुन त्यायोगे या तलावांची सर्व सार्वजनिक ठिकाणे आकर्षक रहावीत या दृष्टीकोनातून सौदर्यीकरणाचा कार्यक्रम आखला जातो.

महापालिका क्षेत्रात एकूण ३५ तलाव असुन यामध्ये रायालदेवी, मासुंदा, घोसाळे, उपवन व हरियाली तलाव हे बी.ओ.टी तत्वावर दिले असुन या वर्षी प्रथम टप्प्यात मखमली, खर्डी, खिडकाळी, डावला जेल, कोलबाड व देवसर या तलावांची कामे पुर्ण केली असून, देसाई, कौसा, तुर्फेपाडा व कासारवडवली यांची कामे सुरु असुन माहे जून २०१३ पुर्वी सदर कामे पूर्ण करण्यांत येतील.

आगामी वर्षात कचराळी, शिवाजीनगर- कळवा, ब्रम्हांड, मुंब्रेश्वर, वाघबीळ-कावेसर व कौसा तलावांचे नुतनीकरण/ सौदर्यीकरण करण्याचे नियोजन करण्यांत आले आहे. यामध्ये

कचराळी व मखमली तलावाच्या सौंदर्यीकरणात प्रामुख्याने संगणकीय प्रणालीवर आधारीत विविध प्रकारचे / आकाराचे छोटे व मध्यम स्वरुपाचे रंगीत व आकर्षक विद्युत दिव्यांवर आधारित कारंजे आणि सभोवताली आकर्षक दिव्यांची आरास करण्याचा मानस आहे. तसेच या तलावाभोवती असलेल्या जॉगिंग ट्रॅकवर सिंथेटिक रबर ट्रॅकचा वापर प्रायोगिक तत्वावर करण्यांत येणार आहे. अशा नविन सिंथेटिक रबर ट्रॅकचा वापर जॉगिंग साठी केल्याने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून उपयुक्त ठरणार आहे.

मा. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व अर्थसल्लागार यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील तलावांना भेटी देवून या शहरातील तलावांचे शुध्दीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत त्यांना विनंती केली असता त्यांनी याबाबत सहमती दर्शविली आहे. यासाठी पालिका प्रशासनातर्फे तलावांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास राज्य व केंद्र शासनाची मान्यता घेवून निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करुन ही कामे या माध्यमातून करण्याचे प्रस्तावित आहे. एकात्मिक तलाव सौंदर्यीकरणासाठी सन २०१३-१४ साठी **रु. ४ कोटी** तरतूद करण्यांत आली असून तलावांचे पुनरुज्जीवन व शुद्धीकरण या लेखाशीर्षांतर्गत **रु. ४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **३.६** | **प्रदुषण नियंत्रण** | : | **ठाणे महापालिका कार्यालयात वेदर मॉनिटरींग मशीनचे कार्यान्वयन :**<br>वेदर मॉनिटरींग स्टेशन या उपकरणामध्ये वातावरणातील घटक म्हणजेच तापमान, वा-याचा वेग, वा-याची दिशा, पर्जन्यमान, आर्द्रता मोजण्यात येतात. सदर मोजमाप करण्यासाठी मेटलॉन सॉफ्टवेअर वापरण्यात आलेले आहे. त्यामध्ये संगणकावर सातत्याने माहिती उपलब्ध राहते. सदर मोजमाप सेन्सर्सद्वारे (Sensors) करण्यात येते. |
| | | : | **ठाणे महानगरपालिकेची प्रदूषण नियंत्रण नियमावली :**<br>हवा प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी ठाणे महापालिकेने प्रदूषण नियंत्रण नियमावली तयार केलेली आहे. प्रदूषण विभागातर्फे सदर नियमावलीची अंमलबजावणी करण्यात आली असून यामध्ये डिसेंबर २०११ ते ऑक्टोबर २०१२ पर्यंत रु.१५ लक्ष दंड आकारण्यात आला आहे.<br>ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाढती धूळ कमी करण्यासाठी विकासकांना एकत्रित घेऊन एकात्मिक धूळ नियंत्रण कार्यक्रम राबविण्याचा मनोदय आहे. |
| **३.७** | **स्मशानभूमी/ कब्रस्तान नुतनीकरण आणि अपारंपारिक शवदाहिनी (विद्युत,** | : | सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील स्मशानभूमीचे सर्व्हेक्षण पुर्ण करण्यांत आले असुन आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर आराखडा अंतिम केल्यानंतर त्यानुसार नुतनीकरणासाठी एकात्मिक विकास कार्यक्रम हाती घेण्यांचे नियोजन आहे.<br>तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ठाणे |

**एल.पी.जी./डिझेल)**

महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील स्मशानभूमीचे सर्व्हेक्षण करुन आवश्यकतेनुसार शवदाहिनीचे रुपांतर विद्युतदाहिनी करण्याचे नियोजन आहे.त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०१२ - १३ या वर्षात कासारवडवली भागात सुविधा भूखंडावर विकासकामार्फत नवीन स्मशानभूमी बांधण्याचे प्रस्तावित असून त्या अंतर्गत पारंपारिक व अपारंपारिक ( विद्युत / एल.पी.जी. ) शवदाहिनी उभारण्यांत येणार असून सदर काम २०१३-१४ मध्ये पूर्ण होणार आहे. यामध्ये महापालिकेस स्वतःचा निधी द्यावा लागणार नाही. त्यासाठी स्मशानभूमी/ कब्रस्तान नुतनीकरण या लेखाशिर्षकांतर्गत **रु. २.५० कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

स्मशानभुमींच्या देखभाल व सुरक्षेसाठी खाजगी मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे. यासाठी **रु. १० लक्ष** तरतूद करण्यांत आली आहे.

**३.८ महाघाट बांधणे :**

ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये गायमुख रेतीबंदर येथे ८ मीटर लांबी व १० मीटर रुंदी या मोजमापाचे अस्तित्वातील दशक्रिया घाट व विसर्जन घाट आहे. भविष्यातील आवश्यकतेनुसार सदर घाटाचे नियोजीत सुशोभिकरण व विस्तारीत घाटाचे संकल्पचित्र तयार करण्यांत आले असुन २० मी. X १५ मी. रंदीचा घाट व त्यामध्ये दोन जेटीचे बांधकाम करण्याचे नियोजीत आहे. तसेच घाटा लगतच्या भागात १२७ मी. X १२० मी. मोजमापाचे उद्यान व आर्टीफिशीयल पॉंड

दर्शविण्यांत आले आहे. सदर प्रकल्पाकरीता आवश्यक असलेली जागा मेरिटाईम बोर्डाची असुन त्यांच्याबरोबर जागा हस्तांतरण / ना हरकत दाखला मिळणेबाबत पाठपुरावा सुरु असून मेरीटाईम बोर्डाकडून परवानगी मिळाल्यावर सन २०१३-१४ मध्ये बांधकाम करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यांत येईल.यासाठी **रु. १ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**३.९ एकात्मिक नाले विकास प्रकल्प :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकात्मिक नाले विकास प्रकल्प टप्पा क्र. १,२ व ३ जेएनएनयुआरएम अंतर्गत राबविण्यांत आलेला आहे. टप्पा क्र. १ अंतर्गत शहरीभाग, टप्पा क्र. २ घोडबंदर परिसर व टप्पा क्र. ३ कळवा व दिवा परिसरातील काही भागाचा समावेश आहे.

सदर प्रकल्प राबविल्यानंतर मागील पावसाळयात यापुर्वीच्या ७५ पैकी १२ वॉटर लॉगींग क्षेत्र शिल्लक राहीले आहे. जेएनएनयुआरएम प्रकल्पामध्ये समावेश नसलेल्या अस्तित्वातील नाल्यांचा, होल्डींग पॉंडस् व टायडल गेट या कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमूक प्रकल्प अहवाल तयार करण्यांत येत आहे. सन २०१२-१३ या वर्षात वागळे, घोडबंदर व दिवा परिसरामधील अत्यावश्यक असलेल्या नाल्यांचे बांधकामे हाती घेण्यांत येत असून सदरचे बांधकाम २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे. नाले बांधणेसाठी **रु. ३० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**३.१० घनकचरा व्यवस्थापन : :**

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० ची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेकरीता ९ प्रभाग

**घरोघरी कचरा संकलन (घंटागाडी योजना)**

समिती क्षेत्रामध्ये निर्माण होणारा कचरा घरोघरी जाऊन संकलन व वाहतुक करणेकरीता मोठया बंद स्वरुपातील हायड्रोलिक पध्दतीच्या १०० घंटागाडया, छोटया चार चाकी हायड्रोलिक पध्दतीच्या १३ घंटागाडया व तीन चाकी ४८ घंटागाडया भाडे तत्वावर घेण्यात आल्या आहेत. त्याकरीता अर्थसंकल्पात **रु.१५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३.११ सार्वजनिक रस्ते सफाई :**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन साफसफाई अधिक प्रभावी होण्यासाठी सुमारे १५२ कि.मी. मोठया रस्त्यांची साफसफाई खाजगी ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे. सदर कामाकरीता अर्थसंकल्पात रक्कम **रु.२२.०० कोटी** इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**३.१२ स्वच्छता मोहीम :**

ठाणे शहरातील झोपडपट्टया व डोंगर उतारावरील वस्त्यांमध्ये ज्याठिकाणी घंटागाडया पोहोचू शकत नाहीत अशा ठिकाणी ३४४ कचरा वेचकांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर मोहिम कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने ४४१ कचरा वेचक (संकलन) नेमणुकीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात आलेला असून रु.१०००/- ऐवजी रु.१५००/- प्रमाणे मानधनात वाढ सुचविण्यात आलेली असून यासाठी **रु. ७५ लक्ष** तरतूद करण्यांत आली आहे.

**३.१३ जैव वैद्यकीय कचरा :**

जैव वैद्यकीय घनकचरा नियम १९९८ ची अंमलबजावणी करणेकरीता ठाणे महापालिका हद्दीतील एकूण ३६० रुग्णालये व १५५६ दवाखान्यातून निघणा-या एकूण ८०० ते ८५० किलो प्रतिदिन जैव वैद्यकीय घनकच-याची विल्हेवाट छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे उभारण्यात आलेल्या इन्सिनरेटरच्या माध्यमातून करण्यात येते.

**३.१४ बायोमिथेनायझेशन प्रकल्प :**

घनकच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता बायोमिथेन गॅस निर्मितीसाठी शिवाजी महाराज रुग्णालय परिसरात १५ टन क्षमतेचा प्रकल्प आणि हिरानंदानी इस्टेट, पातलीपाडा येथे ५ टन क्षमतेचा प्रकल्प खाजगी सहभागाने सुरु करण्यात आले आहेत. यातून प्रतिदिन २०० युनिट वीज निर्मिती करुन प्रतिदिन २० टन कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रात कचरा निर्माण होणा-या ठिकाणाजवळच ओल्या कच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या  दृष्टिने तसेच त्यापासून ऊर्जा निर्माण करण्याचे दृष्टिने महापालिकेने पुढाकार घेतला असून त्यासाठी खाजगी क्षेत्राला सहभागी केले आहे.

माजिवडा येथील लोढा पॅराडाईस या गृहसंकुलात सदर विकासकाच्या संपूर्ण खर्चाने ५ टन क्षमतेचा

बायोमिथिनायझेशन प्रकल्प उभारण्याचे काम चालू झाले असून मार्च २०१३ मध्ये ते पूर्णत्वास जाईल.

**३.१५ हस्तांतरण स्थानक : विकसित करणे**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कचरा घंटागाडी, ठेकेदारांची वाहने व महापालिकेच्या वाहनांतून संकलित करुन सी.पी. तलाव येथील हस्तांतरण स्थानक येथे गोळा करुन सदर कचरा मोठया १० चाकी बंद वाहनांतून डंपिंग ग्राऊंड येथे वाहतूक करण्यात येते. यामध्ये सुधारणा करुन शास्त्रोक्त पध्दतीने कच-याची वाहतूक हस्तांतरण स्थानक ते डंपिंग ग्राऊंड पर्यत करणेसाठी हस्तांतरण स्थानक विकसित करणे आवश्यक असून, त्यासाठी **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**३.१६ घनकचरा निर्मुलन : त्रिसूत्री योजना**

ठाणे महापालिका क्षेत्रात ६५० ते ७०० मेट्रीक टन कचऱ्याची निर्मिती होत आहे. ठाणे महापालिकेमार्फत ३R(Reduce, Reuse & Recycle) ही संकल्पना राबविण्यात येत असून जी गृहसंकुले ५०% पर्यंत कचरा कमी करतील त्यांना ३% मालमत्ता करात सूट व ५०% पेक्षा जास्त प्रमाणात घनकचऱ्याची विल्हेवाट लावतील त्यांना मालमत्ता करात ५% सूट देण्यात येणार आहे.

**३.१७ यांत्रिक पद्ध्तीने : रस्त्यांची साफसफाई (नवीन प्रकल्प)**

शहरातील आनंदनगर नाका ते माजिवडा नाका , विटावा नाका ते मुंब्रा स्टेशन,कौसा बायपास ते कल्याण फाटा , आयटीआय सर्कल ते तीनहात नाका , खोपट सर्कल ते पोखरण रोड १ व पोखरण रोड क्र.२, गांधीनगर पाण्याची टाकी ते टिकुजीनीवाडी सर्कल, कळवा ब्रीज ते गोल्डन डाईज नाका ते बाळकुम जकात नाका , कापुरबावडी सर्कल ते घोडबंदर रोड

जकात नाका अशी एकुण ५४ कि.मी रस्त्यांची साफसफाई यांत्रिकी पध्दतीने करणे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरचा खर्च सार्वजनिक रस्ते सफाई या लेखाशीर्षांतील **रु.२२ कोटी** तरतुदीमधून करण्यांत येणार आहे.

**३.१८ अत्याधुनिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प (नवीन प्रकल्प) :**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील डायघर येथील नियोजित घनकचरा प्रक्रिया प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर उभारण्यासाठी प्रयत्न करण्यांत आला होता. तथापि, नागरिकांच्या विरोधामुळे सदरचा प्रकल्प उभा राहू शकला नाही. त्यामुळे अत्याधुनिक पध्दतीचा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास मा.महासभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार PPP तत्वावर DBOOT पध्दतीने इन्सिनरेशन प्लान्ट (वेस्ट टू एनर्जी प्रकल्प) उभारण्यासाठी जागतिक स्तरावर स्वारस्याची अभिरुची (E.O.I.) मागविण्यात आली असून, जागतिक स्तरावरील अशाप्रकारचे प्रकल्प उभारलेल्या ११ संस्थांनी E.O.I.सादर केलेला होता. सदर संस्थांच्या प्राप्त E.O.I. ची छाननी करुन सहा पात्र संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. एकुण तीन संस्थानी प्रस्ताव सादर केले असून त्यापैकी दोन संस्था पात्र असून पुढील प्रक्रिया जवळजवळ पुर्ण केली आहे. एका आठवडयात PPP तत्वावर वेस्ट टु एनर्जी प्रकल्पासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर पाठविण्यांत येईल. कोणत्याही कंन्सल्टटची नेमणूक न करता महानगरपालिकेने स्वत: परिश्रम घेऊन सदर प्रस्ताव एवढया कमी वेळात अंतिम टप्प्यापर्यंत आणला आहे. हे नमूद करतांना

मला प्रसन्नता वाटते.

**३.१९ सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर प्रकल्प**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्येचा विचार करुन सुमारे ३६ लक्ष लोकसंख्येसाठी साडंपाण्याचा निचरा करणे व त्यावर प्रक्रिया करणे याकरीता महानगरपालिकेमार्फत मलनिःसारण योजना तयार करण्यांत आलेली असुन सदर योजनेस जेएनएनयुआरएम अंतर्गत मान्यता आहे. या योजनेचे काम सुरु करण्यांत आले असुन सुमारे २५२ द.ल.लि. सांडपाणी एकत्रित करुन त्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन आहे.

सदरच्या दृष्टीकोनातून अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यांत आली असुन कोपरी येथील १२० द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामधुन बाहेर पडणा-या सेकंडरी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण / पुर्नवापर करण्याच्या दृष्टीने शक्यता अभ्यास अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.

वरील प्रमाणे पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा वापर बांधकाम, उद्यानासाठी, रस्ते धुण्याकरीता इ. वापरासाठी करता येईल.यासाठी **रु. ५० लक्ष** तरतूद करण्यांत आली आहे.

## ४. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कार्यक्रम :

**४.१ सौर शहर :**

केंद्रशासनाच्या उर्जा मंत्रालयाने अकराव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत " सौर शहरे " विकसित करण्याचा कार्यक्रमांतर्गत ठाणे शहराची निवड केलेली आहे. सौर शहर विकसित करण्यासाठी Master Plan तयार करण्यात आला असून तो मंजूर करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमातंर्गत विविध सौर

प्रकल्प हाती घेण्यात येत असून त्याकरीता **रु.१.०० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**४.२ विज बचत उपाय योजना :** महापालिका क्षेत्रामध्ये व महापालिका इमारतींमध्ये विजवापरात ऊर्जा कार्यक्षमतेचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. आगामी वर्षामध्ये पथदिव्यांसाठी उर्जा कार्यक्षम व पर्यावरणाभिमुख LED फिटींग बसविण्याचे प्रस्तावित आहे. त्या अंतर्गत बदलण्यात येणा-या सोडियम व्हेपर दिव्यांमुळे विजवापरामध्ये किमान ४०% विजबचत अपेक्षित आहे.

महापालिका इमारतींमध्ये भारत सरकारच्या Bureau of Energy Efficiency यांचा स्टार लेबलिंग कार्यक्रम राबविण्यात येत असून त्या अंतर्गत महापालिका इमारतींतील पारंपारिक पंखे बदलून त्याठिकाणी ५ star rated ५० वॅट क्षमतेचे उर्जा कार्यक्षम २००० पंखे बदलण्यात आलेले आहेत. आगामी वर्षात महापालिका इमारतींत उर्वरीत ठिकाणी पारंपारिक ५००० सिलिंग फॅन बदलण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे ३०% विज बचत होणार आहे. त्याकरीता **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**४.३ पथदिपांचे आधुनिकीकरण :** महापालिका क्षेत्रात नव्याने आवश्यक असलेल्या ठिकाणी तसेच अस्तित्वात असलेल्या पथदिपांचे आधुनिक पध्दतीने नुतनीकरण करण्यासाठी **रु.५.०० कोटीची** तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

## ५ सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती :

**५.१ प्राथमिक शिक्षण :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी व इंग्रजी माध्यमाच्या अशा एकूण १२९ शाळा ७८ इमारतींमध्ये सुरु असून शाळांमध्ये एकूण ३८,१९२ विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेत असून ११८७ शिक्षक आहेत.

ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळामार्फत ठाणे महापालिका प्राथमिक शाळांतील सर्व विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात **रु. १७ कोटी** तरतूद करण्यांत आलेली आहे.

**५.२ आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा :** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील उर्वरित २ मुख्य शस्त्रक्रियागृहातील शस्त्रक्रियागृहांचे नुतनीकरण करुन त्या ठिकाणी अतिरिक्त ४ उच्च प्रतीच्या शस्त्रक्रियागृहांची निर्मिती करण्यांत यंणार आहें. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील दुस-या मजल्यावर २० हजार स्क्वे.फुट क्षेत्रफळाच्या जागेत Cathlab, Angiography, Angioplasty, Heart by-pass surgery & Neuro-Surgery विभाग नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अति उच्च प्रतीची शस्त्रक्रियागृहे व स्वतंत्र Cardiac, ICU व Neurosurgery ICU कक्षाची निर्मिती करणे व सदरचा विभाग सन २०१४ अखेर पुर्ण करुन नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचा ठाणे महानगरपालिकेचा मानस आहे. याव्दारे ठाणेकर नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी आरोग्य

योजने अंतर्गत उपलब्ध होणा-या सर्व प्रकारच्या रोगांसाठी होणारा खर्च हा महाराष्ट्र शासनाकडून प्रतिपुर्ती स्वरुपात महापालिकेला उपलब्ध होईल. सदरची योजना कार्यान्वित केल्यामुळे गोरगरिब रुग्णांना Angiography, Angioplasty, Heart by-pass surgery व मेंदुवरील सर्व प्रकारच्या अति उच्च शस्त्रक्रिया तसेच पाठीच्या मणक्यावरील अति उच्च प्रतीच्या शस्त्रक्रिया उपलब्ध होतील.

**Mamography Biopsy Machine बसविणेबाबत :** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाकडे महिलांमधील कर्करोगाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी व महिलांचे आयुष्यमान उंचावण्यासाठी आरोग्य विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाकडे Mamography Biopsy Machine उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सर्व दवाखान्यांतील उपकरणे खरेदीसाठी **रु.११ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**६ आपत्कालीन व्यवस्थापन :**

**६.१ प्रादेशिक आपत्ती : व्यवस्थापन कक्ष**

प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष वातानुकुलित कॉन्फरन्स रुम सह अद्ययावत करण्यांत आलेला असून कक्षात तसेच कक्षाच्या वाहनांवर अग्निशमन दल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडील जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्का साठी बिनतारी संदेश यंत्रणा (वायरलेस) उपलब्ध आहेत.

मुख्यालयातील जकात विभागाच्या वरील बाजुस नव्याने तयार करण्यांत येत असलेल्या आयुक्त कार्यालयात

सदर कक्षाशी संलग्न " कमांड ॲण्ड कंट्रोल रुम " तयार करण्यांत येणार असुन सदर कंट्रोल रुमद्वारे भविष्यातील मोठया आपत्तीच्या निवारणासाठी आयुक्तांच्या कार्यालातुन आपत्ती संदर्भात नियोजन, आपत्ती काळात नियंत्रण व आपत्ती विषयक अद्ययावत माहिती जनतेसाठी उपलब्ध करणे शक्य होईल.

या लेखाशिर्षकांतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात **रु. ३.५० कोटी** तरतुद करण्यात आली असून पूर व आपत्ती नियंत्रण या लेखाशीर्षांतर्गत **रु. १.५० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**६.२ अग्निशमन सेवा : सुधारणा**

**अग्निशमन केंद्र, टिएमटी आरक्षण, प्रभाग कार्यालय :-**

मौजे ओवळा येथील अग्निशमन केंद्र, ठाणे परिवहन सेवा व प्रभाग कार्यालय ही आरक्षणे एकत्रितरित्या विकसित करण्याचे नियोजन आहे. नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी **रु. १.५० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

अग्निशमन विभागाचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी साधनसामुग्री खरेदी या लेखाशीर्षकामध्ये रक्कम **रु. ८ कोटी** प्रस्तावित केले असून, आधुनिक साधनसामुग्री खरेदी करण्याकरीता **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे. अग्निशमन विभागाकडून प्राप्त होणारे उत्पन्न अग्निशमन सेवेवरच खर्च करण्याचा मानस आहे.

## ७ समाज कल्याण :

**७.१ महिला व बाल कल्याण कार्यक्रम :** महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत ५ % निधी राखीव ठेवण्यांत येतो. महिला व बाल कल्याण कार्यक्रमांतर्गत या आर्थिक वर्षात वेगवेगळया योजनांसाठी अर्थसंकल्पात **रु. २० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**७.२ अपंगांसाठी कल्याणकारी योजना :** समाज विकास विभागामार्फत अपंगांना उपचारासाठी व साहित्य खरेदीसाठी व स्वयं रोजगारासाठी आर्थिक मदत प्रस्तावित आहे. तसेच जिद्द शाळेकडील विद्यार्थ्यांच्या औषधोपचाराचा खर्च देखील या निधीतून कण्यांत येणार आहे. अपंगांच्या विविध योजनांसाठी सन २०१३-१४ मध्ये यासाठी रु**. २ कोटी** तरतूद ठेवण्यांत येत आहे.

**७.३ मागासवर्गीय कल्याण :** मागासवर्गीय निधी अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये पूर्ण खर्च होण्याची शक्यता कमी असल्याने व सदरचा निधी व्यपगत होत नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत **रु. ४२.७८ कोटी** व घनकचरा व्यवस्थापन या विभागांतर्गत **रु.७ कोटी** अशी एकूण **रु. ४९.७८ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत येत आहे.

## ८ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान (JNNURM)

**८.१ भुयारी गटार योजना टप्पा १,२, व ३ :** टप्पा क्रमांक १ अंतर्गत दोन निविदा , टप्पा क्रमांक २ अंतर्गत चार निविदा व टप्पा क्रमांक ३ अंतर्गत एक निविदा अशा एकूण सात निविदाकारांमार्फत कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तुत प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक १ अंतर्गत ९४% , टप्पा क्रमांक २

अंतर्गत ४०% व टप्पा क्रमांक ३ अंतर्गत ८०% एवढी भौतिक प्रगती झालेली आहे. भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक १,२, व ३ साठी अनुक्रमे **रु.२० कोटी, रु.५० कोटी व रु.२५ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे. पुढील वर्षी ही सर्व कामे पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे.

**८.२ भुयारी गटार योजना टप्पा क्र. ४ :** भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक ४ अंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा व घोडबंदर रोड (मानपाडयापासून गायमुख पर्यंत) या क्षेत्रातील कामाचा समावेश करण्यांत आला आहे. त्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यांत आला असून राज्य व केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत आलेला आहे. भुयारी गटार योजना टप्पा क्रमांक ४ साठी **रु. ५ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**८.३ बीएसयुपी योजना :** केंद्र शासन, राज्य शासन आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, जेएनएनयुआरएम अंतर्गत बीएसयुपी योजनेच्या माध्यमातून ८ क्लस्टर झोन मध्ये ७७४५ सदनिका मंजूर करण्यांत आलेल्या आहेत. या अंतर्गत प्रकल्प - १ मध्ये ४६२१, प्रकल्प - २ मध्ये ८२२, प्रकल्प - ३ मध्ये ११६० व प्रकल्प - ४ मध्ये ११४२ एवढया सदनिका उपलब्ध होणार आहेत. सन २०११-१२ मध्ये प्रकल्प २ अंतर्गत ८२२ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यांत आले असून सदरच्या सदनिका लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहेत. उर्वरित सदनिका मार्च २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्रकल्प क्रमांक ३ व ४ यांना वर्ष २०१२ मध्ये मंजूरी

मिळाल्यानंतर त्याअंतर्गत अनुक्रमे ११६० व ११४२ या सदनिका बांधकामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असून सदर निविदा मंजुरीच्या प्रक्रियेत असून सदरचे बांधकाम मार्च २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी बी.एस.यु.पी. टप्पा III **रु.४०.६६ कोटी** व बी.एस.यु.पी. टप्पा IV करीता **रु.४०.५९ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

८.४ **JNNURM अंतर्गत नविन विकास कामे** : JNNURM अंतर्गत पाणी पुरवठा व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नवीन विकास कामे हाती घेण्यांत येणार असून त्या अंतर्गत उत्तरेकडील वर्तकनगर व घोडबंदर परीसरातील व पुर्वेकडील मुंब्रा परिसरातील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडेलिंग, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नळ संयोजनांवर मीटर बसविण्याचे व मलनिःसारणा अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा क्र. ४ व वॉटर फ्रंन्ट डेव्हलपमेंटचा प्रस्ताव जेएनएनयुआरएमकडे निधी मिळणेबाबतच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेला आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे. त्यामुळे या कामांसाठी केंद्र शासनाकडून रु.५० कोटी व महापालिका हिस्सा रु. ५० कोटी अशी एकूण **रु. १०० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

९ **परिवहन सेवेस अनुदान** : परिवहन सेवा स्थापन होऊन २५ वर्षे पूर्ण झाली असून परिवहन सेवेने आता स्वावलंबी होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षात परिवहन सेवेस अनुदानापोटी **रु. २० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

## १० भविष्यकालीन योजना :

### १०.१ येऊर हिल पर्यटन : विकास

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येऊर सारख्या घनदाट वनराईने बहरलेला परिसर आहे. महाराष्ट्र शासनाने २००६ मध्ये पारीत केलेल्या ठरावा अन्वये पर्यटन धोरण राबविणेबाबत काही मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वानुसार ठाण्यातील या परिसराची पाहणी व त्याअनुषंगाने अभ्यास केला असता आपणांस पर्यटकांना आकर्षित करेल अशा स्वरुपाचे पर्यटन केंद्र विकसित करता येणे शक्य आहे.

या पर्यटन स्थळामध्ये अस्तित्वातील वन्य जीवांना सुरक्षित ठेवून आपणांस वाईल्ड लाईफ सफारी सुविधा , ट्रेकींग सुविधा, नॅचरल ट्रेल्स, ट्रेकींग करतांना विश्राम करण्यासाठी नेसर्गिक आकर्षक गजीबोज ,सिटींग ॲरेजमेन्ट, बोटेनिकल गार्डन, लॅण्डस्केपिंगस्, विविध ठिकाणी आकर्षक व मनोरंजक उद्याने आणि लहान मुलांसाठी खेळण्या - बागडण्यासाठीचा स्वतंत्र परिसर, योगा झोनस्, नॅचरल हेल्थ सेंटर्स व वन्यजीवांची अद्ययावत माहिती केंद्र, पर्यटकांची राहण्याची सर्वोत्तम व्यवस्था इत्यादी बाबींचे सविस्तर नियोजन व आराखडे तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

पुढील वर्षी याबाबतचा संपूर्ण आराखडा तयार करुन हा परिसर पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यासाठी महापालिका प्रशासनाचा राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचा मानस आहे.यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१०.२ Save National Park Project Road**

**संजय गांधी उद्यानालगत श्रीनगर ते गायमुख पर्यंत ४० मी. रस्त्याबाबत :**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील श्रीनगर ते पोखरण रोड नं. १ , उपवन व पोखरण रोड नं. १ ते गायमुख पर्यंत सुमारे १३ कि. मी. रस्ता प्रस्तावित असून, सदर रस्ता हा शहरी भागाच्या बाहेरुन घोडबंदर रस्त्यास पर्यायी म्हणून वापरता येईल व सदर भागात जॉगिंग ट्रॅक व सायकल ट्रॅक या सुविधा पुरविण्याचा मानस असून सदर रस्त्या लगत असलेल्या विकास प्रस्तावा अंतर्गत प्राप्त सुविधा भूखंडावर मैदान व त्या अनुषंगीक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजित आहे. तसेच सदर रस्त्याचा विकास झाल्यावर वन विभागाच्या हद्दीत होणारे अतिक्रमण रोखण्यास मदत होईल. सदर ठिकाणची आरक्षणे व जोड रस्त्याचे सविस्तर सर्वेक्षण व त्यानुसार रस्ता रेषा कायम करणे व फेरबदलाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. त्यास मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**१०.३ कळवा नाटयगृह :**

कळवा येथे पारसिक या विभागात R.G.२४ या भुखंडाचा १४००० वर्ग मीटर क्षेत्रफळाचा राखीव भुखंड उपलब्ध असून सदर ठिकाणी नाटयगृह तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

पारसिक हा विभाग नव्याने व झपाटयाने विकसित होणारा कळव्याचा भाग असून, कळवा विभागात नाटयगृह अथवा अन्य सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सोय उपलब्ध

नसल्याने या नाटयगृहाचा आस्वाद सर्व कळव्यातील नागरीक घेऊ शकतील.

सदर नाटयगृहाची असान व्यवस्था ही १००० ते १२०० असेल. या नाटयगृहामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम होऊ शकतील.

डॉ.काशिनाथ घाणेकर नाटयगृहाप्रमाणे कळवा येथे पीपीपी तत्वावर विकासकाकडून नाटयगृह बांधण्याचे नियोजन आहे. यावर होणारा संपूर्ण खर्च विकासकामार्फत होणार असून त्यासाठी Value based TDR देऊन निविदा मागवून सदरचे काम करण्याचे प्रस्तावित आहे. या लेखाशिर्षकांतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात **रु. ५० लक्ष** तरतूद करण्यात आलेली आहे.

**१०.४ खाडी किनारा : विकास प्रकल्प, शॅलो वॉटर पार्क वॉटर फ्रन्ट विकास**

ठाणे शहरास ३० कि.मी. लांबीचा खाडी परिसर लाभला असून सदर खाडी दिवा, मुंब्रा आणि घोडबंदर रोडवरील गायमुख परिसरापर्यंत पसरली आहे. तसेच, या खाडीस समांतर असा १२ कि. मी. लांबीचा कळवा ते गायमुख पर्यंतचा रस्ता मंजूर विकास आराखडयात अंतर्भुत आहे. सदर खाडी किना-यावर मॅंग्रुव्हज अस्तित्वात असून त्यावर अनधिकृत झोपडयांचे निर्माण, मुंब्रा व दिवा परिसरातील खाडी किनारे डेब्रीज द्वारे बुजवून जमीन तयार करुन तिचा गैरवापर करुन व खाडीतुन अनधिकृतपणे रेतीचा उपसा करुन नायनाट करण्यांत येत आहे.

जर हा खाडी किनारा नियोजनबध्द व सुसुत्रित पध्दतीने विकसित केला तर शहराच्या पर्यावरणीय बाबींमध्ये सुधारणा

होऊन या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या मँग्रुव्हजचे जतन होईल व त्या जवळील परिसराच्या अनधिकृत बांधकामापासून बचाव होईल. तसेच खाडी किनारा विकसित केल्याने जागतिक स्तरावर शहराचे सौदर्यीकरण, गेट वे ऑफ इंडिया ते वसई पर्यतची जलवाहतूक, खाडी किना-यावर मँग्रुव्हज डेल्स, प्रॉमिनेड्स, जॉगिंग ट्रॅक्स, सायकल ट्रॅक्स, पब्लिक प्लेसेस, मिनी पिकनीक सेंटर्स इत्यादी बाबी विकसित करता येतील. अशा स्वरुपाच्या बी. ओ.टी प्रकल्पात भुमीपुत्र व जागा मालक यांना नियमानुसार प्राधान्याने समावुन घेणेचे प्रस्तावित आहे.

या सोबत घोडबंदर रस्त्यानजिक शासनाच्या जागेवर आरिक्षत असलेल्या शॅलो वॉटर पार्कचे देखिल नियोजन, संकल्पन व अंमलबजावणी बाबतची देखील कार्यवाही या वॉटरफ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पासोबत संयुक्तीकरीत्या होणे आवश्यक असल्याने यामध्ये त्याचा देखिल समावेश करण्यांत आला आहे.

ठाणे शहरातून जाणा-या अवजड वाहतूकीस शहराबाहेरुन मुक्त रस्ता देणे , खाडी किनारा सुशोभित करुन त्यालगतची आरक्षणे विकसित करणे , शॅलो वॉटर पार्क विकसित करणे , त्यास जोडणा-या रस्त्यांचे निर्माण करणे व जलवाहतुकींचे नियोजन करणे यासाठी एकत्रितदृष्टया नियोजन व आराखडे तयार करणे आवश्यक असल्याचे आढळून आले.

त्यामुळे या कामी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवी सल्लागाराची नेमणूक करुन सल्लागाराने व महापालिकेतील अभियंता गटाने सखोल चर्चा आणि निर्णयात्मक कार्यशाळांच्या माध्यमातून संपूर्ण ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाटॅरफ्रंन्ट डेव्हलपमेंन्ट मास्टर प्लॅनचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

यामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण खाडी परिसर हा सुशोभिकरणाच्या माध्यमातून १३ झोनस् मध्ये विभागून घेण्यांत आला आहे. या नियोजनात प्रामुख्याने खाडी सफाई, सिटी कनव्हेनशन सेंटर्स, प्रॉमिनेड्स, सायकल ट्रॅक्स, मॅंग्रुव्हज टेल्स, मिनी पिकनिक सेंटर्स, जॉगिंग ट्रॅक्स, पब्लिक प्लेसेस व खाडी कडे जाण्यासाठीचे रस्ते, ट्राम आणि जलवाहतुकीसाठी जेटीज् इत्यादी बाबींचे नियोजन केले आहे.

हा प्रकल्प राबविण्यासाठी मंजुर आराखडयात काही बदल करावे लागणार असून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यांत येतील. तद्नंतर नियमानुसार यावर पुढील मान्यतेसाठीच्या आवश्यक त्या कार्यवाही - शासन मान्यतेसाठी सी.आर.झेड क्लिअरन्स व महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांच्या परवानगी करीता प्रस्ताव पाठवुन त्या मान्यतेनंतर ही कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्यांत येतील.

यामध्ये प्रथमत: " शो केस प्रकल्प " म्हणून शहराच्या मध्यभागी असलेले ठाणे कॉलेज ते साकेत पर्यंतचा १.२३ कि.मी. लांबीचा खाडी परिसर सुशोभिकरणाचा खाडी सफाई,

सिटी कनव्हेन्शन सेंटर्स, प्रॅामिनेड्स, सायकल ट्रॅक्स, मँग्रुव्हज टेल्स, मिनी पिकनिक सेंटर्स, जॉगिंग ट्रॅक्स, पब्लिक प्लेसेस व खाडी कडे जाण्यासाठीचे रस्ते इत्यादी बाबींवर सविस्तर नियोजन करुन शासन मान्यतेसाठी सी.आर.झेडकडे क्लिअरन्स व महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांच्या परवानगी नंतर पुढील काम हाती घेण्यांत येईल.

सद्यस्थितीत, या प्रकल्पाचा मसुदा आराखडा तयार असून त्यास मान्यता मिळणेसाठी मा. महासभेकडे सादर केला आहे. तसेच शोकेस प्रकल्पाच्या १३२.७५ कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल देखील जेएनएनयुआरएम अंतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी शासनाकडे सादर करण्यांत आला आहे.

अशा स्वरुपाचा हा बहुआयामी प्रकल्प आणि ठाणे शहराचा तद्वतच खाडी परिसराचा कायापालट करणा-या या प्रकल्पाचे केलेल्या नियोजनाप्रमाणे टप्प्या- टप्प्याने अंमलबजावणी केल्यास निश्चितच आंतरराष्ट्रीय स्तरावर ठाणे शहराची एक वेगळी ओळख होवून ते प्रसिध्दीस येईल व त्यासाठी महापालिकेमार्फत आपण सर्वांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यांस कटीबध्द रहावे असे मी आपणांस प्रतिपादित करतो. यासाठी **रु.१२ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**१०.५ खारेगांव लेव्हल : क्रॉसिंगवर**

गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने मागणी होत असलेल्या खारेगाव येथील मध्य रेल्वे लाईनवर आर.ओ.बी. बांधणेबाबत महानगरपालिकेने संपूर्ण ड्रॉईंग डिझाईनसह

**आर.ओ.बी.**

अंदाजखर्च तयार करुन रेल्वे विभागाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे. सदर प्रस्तावास रेल्वेची मान्यता मिळाल्यानंतर या ठिकाणी आर.ओ.बी. बांधणेचे काम सुरु करण्यांत येणार असून हे काम ५०-५०% कॉस्ट शेअरींगवर असल्याने रेल्वेच्या भागामधील काम रेल्वे स्वतः करणार असून, रेल्वे हद्दीबाहेरील पूलाच्या जोडरस्त्याचे काम ठाणे महानगरपालिका करणार आहे. या कामाकरीता **रु.५० लक्ष** तरतूद करण्यांत आलेली आहे.

**१०.६ मनिषानगर तरण तलाव मेक ओव्हर**

मनिषानगर येथे यशवंत रामा साळवी तरण तलाव असून १९८७ सालामध्ये महापालिकेमार्फत बांधण्यात आला होता. सद्यस्थितीत तरण तलाव हा कार्यान्वित असून काही भागात प्रभाग कार्यालय सुरु आहे.

कळवा प्रभाग कार्यालयाचे नव्याने सुसज्ज कार्यालय अंतिम टप्प्यात असून प्रभाग कार्यालय स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरीत झाल्यानंतर तरण तलावाच्या जागेत अन्य खेळाच्या सुविधा जसे टेबल टेनिस, स्क्वॉश, बिलिअर्डस, बॅडमिंटन अशा अनेक खेळांसाठी सुसज्ज स्पोर्टस कॉम्पलेक्स बनविण्यांत येईल. तसेच सदर इमारतीमध्ये काही व्यापारी गाळे तयार करुन त्या द्वारे महापालिकेस उत्पन्न मिळेल. संपूर्ण इमारत ही **" बांधा वापरा व हस्तांतरीत "**तत्वावर नव्याने स्वरुप देण्याचे महापालिकेचे प्रयोजन आहे.

**१०.७ गावदेवी ॲम्पी थिएटर, कळवा**

कळवा गावदेवी येथे गावदेवी मैदान हे महापालिकेच्या मालकीचे असून एकूण २२५०० क्षेत्रफळाची ही जागा असून कळवा विभागातील मध्यवर्ती जागा आहे.

सदर मैदानाच्या एका बाजूस ॲम्पी थिएटर्स करण्याचे प्रयोजन असून त्याचा वापर कळव्यातील नागरीकांना होईल. या मैदानात ५०० नागरिक या ॲम्पी थिएटर्स द्वारा आयोजित कार्यक्रमाचा आस्वाद घेऊ शकतील. प्रस्तावित कामासाठी आमदार निधी अंतर्गत निधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

**१०.८ लाईट रेल ट्रान्झीट प्रकल्प :**

ठाणे महानगरपालिका दि. १ नाव्हेंबर १९८२ रोजी अस्तित्वात आली असून महापालिकेचे भौगोलिक स्थान, दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता, किफायतशीर राहणीमान यामुळे ठाणे शहराचे झपाटयाने नागरीकरण झाले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे शहराची लोकसंख्या १८ लक्ष इतकी आहे. वाढत्या नागरीकरणामुळे नागरीकांना शहरा अंतर्गत वाहतूकीसाठी जलद वाहतुकीच्या सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ठाणे महानगरपालिकेमार्फत तसेच शासन निर्देशित संस्थेमार्फत वेळोवेळी वाहतूकीचे सर्वेक्षण करण्यांत आले असून अभ्यासाअंती वाहतूकीचे विविध मार्ग सुचविण्यांत आले असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यांत आला आहे.

ठाणे शहराच्या उत्तरेकडील भागाचे मोठया प्रमाणात नागरीकरण होत असून वाहतूकीच्या उपलब्ध व्यवस्थेवर मोठया प्रमाणात ताण येत असल्याने यापूर्वी केलेल्या विविध वाहतूक अभ्यासात काढण्यांत आलेले निष्कर्ष व सुचविण्यांत आलेले मार्ग याचा विचार करुन आनंदनगर ते ओवळा या मार्गावर पूर्वेकडील बाजूस असलेल्या सर्व्हीस रोडवर अंदाजे

१० कि.मी. लांबीच्या मार्गावर कासारवडवली पर्यंत प्रथम टप्प्यात लाईट रेल ट्रान्झीट प्रकल्प (एल.आर.टी) राबविण्याचे प्रस्तावित आहे. एल.आर.टी साठी येणारा खर्च इतर वाहतूक तंत्रज्ञानापेक्षा कमी असून, एल.आर.टी प्रदुषण विरहीत आहे. तसेच कामाच्या अंमलबजावणीसाठी लागणारा कालावधी तुलनेने कमी असून गॅप फडींगचे (VGF) गुणोत्तर ही कमी आहे. म्हणून एल.आर.टी या सार्वजनिक वाहतूकीसाठी सुधारणा व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**११ प्रशासकीय कामकाजात सुधारणा :**

**११.१ संगणकीकरण :** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात ठाणे महानगर पालिकेमध्ये संगणक विभागामार्फत सर्व विभागाचे संगणीकीकरण करणेसाठी भरीव पावले उचलण्यात आलेली आहेत. सदर आर्थिक वर्षात महापालिकेच्या जुन्या वेबसाईटचा संपूर्ण चेहरामोहरा बदलून अद्यावत तंत्रज्ञान ,आकर्षक मांडणी व पुरेपुर माहितीच्या आधारे जागतिक दर्जाची नवीन वेबसाईट तयार करुन ठाणे महानगर पालिकेच्या वर्धापनदिनी सर्वासांठी खुली करण्यात आलेली आहे. या आर्थिक वर्षात संगणक विभागामार्फत जी.आय.एस. प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून त्यातील Attribute माहिती भरण्याचे, सर्व मालमत्तेचे Ground Truthing करुन त्यांची माहिती गोळा करणेचे

काम सुरु आहे. GIS प्रणाली अंतर्गत आरोग्य विभागासाठी तयार करण्यात आलेल्या **'Health GIS'** या भुमाहिती संपन्न संगणक प्रणालीला देशातील सर्वाच्च समजल्या जाणाऱ्या **' स्कॉच सुवर्ण पुरस्कार'** तसेच **'जिओस्पॅशीअल एक्सीलेन्स इन हेल्थ'** पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेचे स्वतःचे डाटा सेंटर तयार करुन त्यामध्ये अद्ययावत व तांत्रिक दृष्टया सक्षम प्रणाली कार्यान्वीत करणे व महापालिकेचे मुख्य कार्यालय व सर्व प्रभाग कार्यालय यांना नेटवर्कींग द्वारे जोडण्याची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे . तसेच डाटा सेंटरसाठी कोलशेत येथील सुविधा भुखडांची जागा अंतिम केलेली आहे.

पुढील आर्थिक वर्षात डाटा सेंटर तयार करणे, मुख्यालय व सर्व प्रभाग कार्यालये यांची नेटवर्किंग करणे हा महापालिकेंचे संगणकीकरणच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा पुर्ण होणार आहे. सदर डाटा सेंटर व नेटवर्कींगमुळे बऱ्याच सुविधा ऑनलाईन करणे व सर्व संगणकांमधील माहिती सुरक्षित ठेवणे शक्य होणार आहे. तसेच पुढील वर्षामध्ये महापालिकेच्या कामात एकसंघता येणेसाठी SAP + GIS ही प्रणाली कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. ठाणे महानगरपालिकेसाठी महापालिका क्षेत्रात उद्‌भवू शकणा-या आपत्कालीन परिस्थितीशी सामना करणेसाठी व त्यावेळी सक्षम अधिका-यांना निर्णय घणेसाठी अतिशय उपयुक्त असे

अद्ययात 'Emergency Command & Control Operation Center' म्हणजेच आपत्कालीन निर्णय व नियंत्रण कक्ष तयार करणे प्रस्तावित आहे. महापालिकेतील सर्व विभागांच्या नस्त्यांचे टप्प्या-टप्प्यामध्ये डिजिटलायझ ेशन करणे प्रस्तावित आहे. यासाठी **रु. १३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**११.२ नागरी सुविधा केंद्राचे व प्रस्तावित एल.बी.टी. प्रणालीचे काम बाहययंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) करुन घेणे.**

ठाणे महानगरपालिकेच्या कामाची व्याप्ती पहाता सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वर्गाकडुन काम करुन घेणे कठीण होत आहे. सध्या महापालिकेच्या आस्थापनेवर मोठया प्रमाणात रिक्त पदे असून शासनाकडे नवीन पदमंजूरीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याने उपलब्ध मनुष्यबळाकडून काम करुन घ्यावे लागत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजावर व वसूलीवर परिणाम होत असून नागरीकांच्या मोठया प्रमाणातील तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. या तक्रारीचे तत्काळ निवारण होण्याच्या दृष्टीने बाहययंत्रणेकडून (आऊटसोर्सिंगद्वारे) कामे करुन घेणे क्रमप्राप्त झालेले आहे.

नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात येणा-या सुविधामध्ये वाढ करण्यासाठी व भविष्यात स्थानिक संस्था कर लागू होणार असल्याने बाहययंत्रणेकडुन स्थानिक संस्थाकर नोंदणी, संगणक प्रणाली परिचालन, लेखांकन, बँक ताळमेळ इत्यादी कामे करुन घेणे आवश्यक आहे. परंतु याकामी अंतिम निर्णय महापालिकेचे सक्षम अधिकारीच

घेतील. शासनाच्या वित्त विभागाच्या दि. १ फेब्रुवारी २०१३ च्या परिपत्रकामध्ये याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यांत आल्या असून त्या सुचनानुसार ठामपामध्ये बाहययंत्रणेमार्फत कामे करुन घेतल्यामुळे रिक्त पदे भरण्याची व नवीन पदे मंजूर करण्याची आवश्यकता भासणार नसून नवीन पदनिर्मितीवरील होणा-या खर्चात बचत होईल.

बाहययंत्रणेद्वारे कामे करुन घेतांना, जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चापेक्षा २५% पर्यंत बचत होणार आहे. बाहययंत्रणेद्वारे काम करुन घेणेसाठी शासनाच्या विहीत पध्दतीने निविदा मागवून यंत्रणा, संस्था किंवा ठेकेदार निश्चित करणे आवश्यक आहे. या कामी शासनाने परिपत्रकान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तीचा अंतर्भाव करण्यांत येईल. वरील प्रमाणे काम करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) मागवून त्यामधून कंपनी किंवा संस्था निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे. असे केल्यास खर्चातील बचतीसोबत प्रशासनाची कार्यक्षमता (Efficiency) व प्रभावीपणात (Effectiveness) वृद्धी होणे अपेक्षित आहे. सद्या त्या जागेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकडून अन्य कामे उदा. मालमत्ता कर व पाणी पुरवठा आकार वसुली करण्यात येईल. त्यासाठी “बाहययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी कार्यालयीन खर्च” या नवीन लेखाशिर्षाअंतर्गत रु. ४ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

## आभार :

मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान व सार्वजनिक रिन्युवेबल एनर्जी व सोलार सिटी आणि अन्य कार्यक्रमांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले त्यांचे कृतज्ञतापुर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे महाराष्ट्राचें मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मा.उपसभापती, विधान परिषद, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव , महानगर आयुक्त आणि विशेषतः नगर विकास विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना सतत मार्गदर्शन करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती , स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षीय मा.गटनेते व सर्व नगरसेवक व सर्व पक्षांचे मा.लोकप्रतिनिधी यांचे मनःपुर्वक आभार व्यक्त करतो. या वर्षी ठाणे महानगरपालिकेला " Most Pro-Active Municipal Corporation " म्हणून एक सन्मान सुध्दा मिळालेला आहे, हे मी नम्रपणे नमूद करु इच्छितो.

ठाणे महानगरपालिकेच्या या सर्व कार्यक्रम अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभागी असलेले व सांघिक वृत्तीने काम करणारे अधिकारी व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचेदेखील मी आभार मानतो. तसेच अर्थसंकल्पीय कामकाजासाठी लेखा व अन्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी बहुमोल सहकार्य केले त्यांचे आभार मानतो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना , प्रकल्पांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टिने आपला सहभाग

व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस शिफारस करणेसाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

सस्नेह धन्यवाद !

आर.ए.राजीव,
महापालिका आयुक्त.

## जमा - खर्चाचा प्रधानशीर्षनिहाय गोषवारा ( अर्थसंकल्प अ + क )

(रु. लाखात)

| | जमा | सन २०१२-१३ चे मूळ अंदाज | सन २०१२-१३ चे सुधारित अंदाज | सन २०१३-१४ चे मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|
| १ | जमिनी व इमारतीवरील कर | २०८५६.०० | २०८७९.९५ | २४६५१.३० |
| २ | जकात कर | ५६९९५.१० | ५५२९५.१० | ६०७०५.०० |
| ३ | इतर कर | ६२५.०० | ५११.०० | ५३६.०० |
| ४ | मालमत्ता व सेवा यापासून उत्पन्न | ४७९५२.६१ | ३३०२६.८४ | ३७६७६.२१ |
| ५ | पाणी पुरवठा व मलनि:सारण | १००७७.२५ | ९१३२.४० | १०१६९.२५ |
| ६ | इतर उत्पन्न | २१९५.६१ | २१५४.७१ | १९६२.८३ |
| अ | महापालिका उत्पन्न | १३८७०१.५७ | १२१०००.०० | १३५७००.५९ |
| ७ | अनुदाने व कर्जे अ+क | २४३८९.२८ | ९६९४.२६ | २३०५४.३१ |
| ८ | JNNURM अंतर्गत अनुदान + कर्ज + लाभार्थी हिस्सा | ३७८६२.५९ | ११५१२.७४ | ३१६६३.३२ |
| ब | एकूण अनुदान + कर्ज + इतर | ६२२५१.८७ | २१२०७.०० | ५४७१७.६३ |
| | एकूण उत्पन्न ( अ + ब ) | २००९५३.४४ | १४२२०७.०० | १९०४१८.२२ |
| | आरंभिची शिल्लक | १६८१०.२५ | १८०००.०० | २९.२४ |
| | आरंभिच्या शिलकेसह एकूण | २१७७६३.६९ | १६०२०७.०० | १९०४४७.४६ |
| | **खर्च** | | | |
| १ | सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च | १४०९५.२१ | १३५३५.५९ | १४३३०.२५ |
| २ | सार्वजनिक सुरक्षितता अग्निशमन ,सुरक्षा व दिवाबत्ती | ५७६३.३८ | ५७७६.१५ | ६६५५.१९ |
| ३ | सार्वजनिक आरोग्य व सोयी | ३७१२८.४९ | ३४८६४.१० | ३८८३४.९५ |
| ४ | सार्वजनिक शिक्षण | १०५१२.४१ | ११११४.६५ | १३९४७.३३ |
| ५ | संकीर्ण | १६०५.२० | १४५४.७० | ९२२.७० |
| | महसुली खर्च " अ " अंदाजपत्रक | ६९१०४.६९ | ६६७९५.१९ | ७४६९०.४२ |
| ६ | पाणी पुरवठा | १५८६१.८० | १४७१९.३७ | १६७६९.७७ |
| ७ | मलनि:सारण | १७०८.१० | १६८४.०० | १९७९.०३ |
| | महसुली खर्च " क " अंदाजपत्रक | १७५६९.९० | १६४०३.३७ | १८७४८.८० |
| | एकूण महसुली खर्च (अ + क) | ८६६७४.५९ | ८३१९८.५६ | ९३४३९.२२ |
| ८ | भांडवली खर्च - " अ " अंदाजपत्रक | ७३४९४.०३ | ६३४७२.७० | ५६६७४.६० |
| ९ | भांडवली खर्च - " क " - पाणी पुरवठा + मलनि:सारण | ६४००.०० | ४२३६.०० | ७१३२.०० |
| | भांडवली खर्च -" अ " + " क "अंदाजपत्रक | ७९८९४.०३ | ६७७०८.७० | ६३८०६.६० |
| १० | भांडवली खर्च - JNNURM | ५११३२.०० | ९२७०.५० | ३३१६०.०० |
| | एकूण भांडवली खर्च (अ + क + JNNURM ) | १३१०२६.०३ | ७६९७९.२० | ९६९६६.६० |
| | एकूण खर्च (महसुली + भांडवली) | २१७७००.६२ | १६०१७७.७६ | १९०४०५.८२ |
| | अखेरची शिल्लक | ६३.०७ | २९.२४ | ४१.६४ |
| | अखेरच्या शिलकेसह एकूण | २१७७६३.६९ | १६०२०७.०० | १९०४४७.४६ |




| एकूण खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-१४ (रु.लाखात) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|
| भांडवली खर्च | ९४११६.६० | ४९.४२ |
| वेतन व भत्त्यावरील खर्च | ४८०१९.६७ | २५.२१ |
| यंत्रणा चालविणे व त्यासाठी खरेदी इ. | १६३९४.५० | ८.६१ |
| देखभाल व दुरुस्ती | ८६०४.०० | ४.५२ |
| पाणी खरेदी खर्च | ७५००.०० | ३.९४ |
| इतर खर्च | ६११५.६९ | ३.२१ |
| कर्ज परतफेड | ५८५०.०० | ३.०७ |
| विजेचा आकार | ३८४७.०० | २.०२ |
| एकूण खर्च | १९०४४७.४६ | १००.०० |




| <u>महापालिका महसुली जमेच्या बाबी</u> | अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-१४ (रु.लाखात ) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|
| जकात | ६०७०५.०० | ४४.७३ |
| जमिनी व इमारतीवरील कर व फी | २६९४०.३८ | १९.८५ |
| विकास व तत्सम कर | २६२००.०० | १९.३१ |
| पाणीपट्टी आकार | १००००.०० | ७.३७ |
| इतर जमा | ५३७७.५१ | ३.९६ |
| सार्वजनिक बांधकाम विभाग | ३४१५.२० | २.५२ |
| अग्निशमन दल | ३०६२.५० | २.२६ |
| एकूण महसुली जमा | १३५७००.५९ | १००.०० |




| सेवानिहाय एकूण खर्चाचा रुपया | अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-१४ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|
| | (रु.लाखात ) | |
| इतर सेवांवरील खर्च | ४५७८७.०९ | २४.०४ |
| सार्वजनिक आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन | २७१४६.९८ | १४.२५ |
| पाणी पुरवठा | २२९५१.७७ | १२.०५ |
| रस्ते , पूल व भुयारी मार्ग | २००५०.०० | १०.५३ |
| आर्थिक दुर्बल घटकांसाठी मुलभुत सोयी | १८४३८.०० | ९.६८ |
| शिक्षण | १४४६२.८३ | ७.५९ |
| जल व मलनि:सारण | १३२७०.०० | ६.९७ |
| सार्वजनिक सुरक्षितता | १०३७५.१९ | ५.४५ |
| JNNURM - विकास कामे | १००००.०० | ५.२५ |
| प्रभागातील विकास कामे | ७९६५.६० | ४.१८ |
| एकूण खर्च | १९०४४७.४६ | १००.०० |




| उत्पन्न /प्राप्तीचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०१३-२०१४ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|
| | (रु.लाखात ) | |
| महसुली उत्पन्न | १३५७००.५९ | ७१.२५ |
| कर्जे | ३१५५८.०० | १६.५७ |
| अनुदाने | २३१५९.६३ | १२.१६ |
| आरंभिची शिल्लक | २९.२४ | ०.०२ |
| एकूण जमा | १९०४४७.४६ | १००.०० |

## सन २०१३-२०१४ अंतर्गत प्रस्तावित नवीन व ठळक प्रकल्प व तरतुदी

| अक्र. | प्रकल्पाचे नांव | तरतुदी |
|---|---|---|
| १ | जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत विविध प्रकल्प | |
| A | आर्थिक दुर्बल घटकांसाठी मुलभूत सोयी (BSUP)फेज - I | ५०००.०० |
| B | आर्थिक दुर्बल घटकांसाठी मुलभूत सोयी (BSUP) फेज - III | ४०६६.०० |
| C | आर्थिक दुर्बल घटकांसाठी मुलभूत सोयी (BSUP) फेज - IV | ४०५९.०० |
| D | भुयारी गटार योजना - फेज I | २०००.०० |
| E | भुयारी गटार योजना - फेज II | ५०००.०० |
| F | भुयारी गटार योजना - फेज III | २५००.०० |
| G | भुयारी गटार योजना - फेज IV | ५००.०० |
| H | JNNURM - विकास कामे | १००००.०० |
| २ | कळवा खाडीवर पूल | २००.०० |
| ३ | हरित जनपथ विकास प्रकल्प (साईनेजीससह) | ४०००.०० |
| ४ | मार्केट बांधणे | २५०.०० |
| ५ | शाळा बांधणे /सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा | ३००.०० |
| ६ | उद्यान विकास | १०२०.०० |
| ७ | श्री स्थानक लोकमार्ग प्रकल्प (बी.आर.टी.एस./लाईट रेल ट्रान्सपोर्ट) | २००.०० |
| ८ | उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा | ११००.०० |
| ९ | राजीव आवास योजना | ३०००.०० |
| १० | ट्रक टर्मिनस | १३०.०० |
| ११ | रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण | १६००.०० |
| १२ | रस्त्यांचे नुतनीकरण / रुंदीकरण - | ५०००.०० |
| १३ | विकास आराखडयातील रस्ते बांधणे | ५००.०० |
| १४ | UTWT पद्धतीने रस्ते नुतनीकरण | ४०००.०० |
| १५ | मिसिंग लिंक | १०००.०० |
| १६ | पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्थेचा विस्तार व मजबुतीकरण | १८००.०० |
| १७ | पूल, भुयारी मार्ग, फ्लाय ओव्हर, RUB,ROB | १८६५.०० |

| अक्र. | प्रकल्पाचे नांव | तरतुदी |
|---|---|---|
| १८ | भूमी संपादन | ४५००.०० |
| १९ | नगरसेवक निधी | २६६७.६० |
| २० | मागासवर्गीय निधी | ४९७८.०० |
| २१ | नागरी परिवन निधी | २०००.०० |
| २२ | अग्निशमन दल आधुनिकीकरण | १०००.०० |
| २३ | संगणकीकरण | १३००.०० |
| २४ | पावसाळी पाण्याचा निचरा | ३०००.०० |
| २५ | घनकचरा व्यवस्थापन | ३३५.०० |
| २६ | रस्त्यावरील दिवाबत्ती / गगनदिप | ५००.०० |
| २७ | कौसा क्रिडा संकुल | ६५०.०० |
| २८ | तलावांचे पुनरुज्जीवन /शुद्धीकरण | ४००.०० |
| २९ | पार्कींग सुविधा उपलब्ध करुन देणे | ३००.०० |
| ३० | एकात्मिक तलाव सौंदर्यीकरण कार्यक्रम | ४००.०० |
| ३१ | डॉ.बाबासोब आंबेडकर श्रम साफल्य योजना | ६००.०० |
| ३२ | एकात्मिक स्मशानभूमी /कब्रस्तान नुतनीकरण कार्यक्रम व अपारंपारिक शवदाहिनी | ४५०.०० |
| ३३ | इनडोअर स्टेडियम | ५०.०० |
| ३४ | सौर शहर विकास प्रकल्प | १००.०० |
| ३५ | सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर प्रकल्प | ५०.०० |
| ३६ | शॅलो वॉटर पार्क ॲण्ड वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट | १२००.०० |
| ३७ | कळवा नाटयगृह | ५०.०० |
| ३८ | कळवा रेल्वे स्टेशन परिसर सुधारणा | ३००.०० |
| ३९ | येऊर हिल्स पर्यटण विकास | २००.०० |
| ४० | स्मारक बांधकाम | ३००.०० |
| ४१ | ठाणे मनोरुग्णालया शेजारी रेल्वे स्थानक अनुषंगिक विकास | २००.०० |